७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. १० जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १६५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# आदिवासी समाजाने आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारावा

## राज्यपाल जिष्णु देव वर्मा : बिरसा मुंडा यांचे बलिदान स्वाभिमानाची प्रेरणा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (दै. संध्या)




आदिवासी समाजाने शिक्षण, कौशल्य विकास, नवोपक्रम आणि आत्मनिर्भरतेच्या माध्यमातून प्रगती साधत राष्ट्रनिर्माणात प्रभावी भूमिका बजावावी, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. महाराष्ट्र लोकभवन येथे आयोजित भगवान बिरसा मुंडा यांच्या 126 व्या बलिदान दिन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी तसेच वेगवेगळया भागातून आलेले आदिवासी बांधव, आदिवासी कलाकार,आदी उपस्थित होते.

राज्यपाल वर्मा म्हणाले की, अवघ्या 25 वर्षांच्या आयुष्यात बिरसा मुंडा यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जागृती घडवून आणली. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, सामाजिक कुरीती आणि विभाजनाविरुद्ध त्यांनी उभारलेला लढा आजही प्रेरणादायी आहे. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगून राज्यपाल म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जनजातीय विकासाविषयीच्या भूमिकेमुळे आदिवासी समाज शिक्षण, रोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या क्षेत्रात पुढे जात आहे.

शिक्षण हीच व्यक्तीला आत्मनिर्भर आणि सक्षम बनविणारी सर्वात मोठी शक्ती आहे. राज्य शासनाकडून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मोफत वसतिगृहे, भोजन व अन्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असून पालकांनी आपल्या मुलांना, विशेषतः मुलींना महाविद्यालयीन शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन राज्यपाल वर्मा यांनी केले. भारतीय इतिहासातील गोंडवाना राज्य आणि गोंड शासकांच्या गौरवशाली परंपरेचे कौतुक करत राज्यपाल वर्मा म्हणाले की, आदिवासी समाजाने हा गौरव पुन्हा प्राप्त करण्यासाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि आर्थिक समृद्धीचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. समाजाला कुपोषण, आजारपण आणि व्यसनमुक्त करण्यासाठीही व्यापक प्रयत्नांची गरज आहे. आदिवासी कला, नृत्य आणि संगीताच्या जतनासाठी व्यापक कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना आदिवासी विकास विभागाला देण्यात आल्या आहेत. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI) यांनी देखील देशातील विविध आदिवासी समाजांचा इतिहास, संस्कृती, परंपरा आणि ज्ञानव्यवस्थेचे दस्तावेजीकरण करावे, असे निर्देश दिले असल्याचेही राज्यपालांनी सांगितले.

ज्येष्ठ तारपा वादक व लोककलावंत भिकल्या धिंडा यांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्याचा उल्लेख करत राज्यपालांनी त्यांचे अभिनंदन केले. हा सन्मान आदिवासी लोककला आणि कलाकारांच्या गौरवाचा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे त्यांनी म्हटले.

जननायक आणि क्रांतीचे महानायक बिरसा मुंडा यांनी अवघ्या 25 वर्षांच्या आयुष्यात इंग्रजी सत्तेला हादरवून सोडले. त्यांच्या बलिदानातून आदिवासी समाजाला स्वाभिमान, संघर्ष आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा मिळत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. फडणवीस म्हणाले की, इंग्रजी राजवटीत आदिवासींचे जल, जमीन आणि जंगल यांवरील हक्क हिरावले जात असताना भगवान बिरसा मुंडा यांनी अन्यायाविरुद्ध क्रांतीची मशाल पेटवली. त्यांच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या आंदोलनामुळे इंग्रजी सत्तेला मोठे आव्हान निर्माण झाले. त्यांनी केवळ सशस्त्र संघर्षच केला नाही, तर समाजजागृती करून आदिवासी समाजाला संघटित करण्याचेही महत्त्वपूर्ण कार्य केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील आदिवासी वीरांचा इतिहास शोधून तो नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे भारतीय इतिहासातील अनेक विस्मृतीत गेलेले आदिवासी नायक पुन्हा प्रकाशझोतात आले.

आदिवासी संस्कृती ही भारतातील सर्वात प्राचीन आणि समृद्ध जीवनपद्धतींपैकी एक असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या संस्कृतीत निसर्ग संवर्धन, सामाजिक समता आणि लोककेंद्रित शासनव्यवस्थेची मूल्ये आढळतात. त्यामुळे या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन करणे ही शासन, समाज आणि देशाची सामूहिक जबाबदारी आहे.

राज्य शासन हे आदिवासी संस्कृतीच्या जतनासाठी आणि आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगून, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि विविध कल्याणकारी योजनांद्वारे सक्षम आदिवासी समाज घडविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या सर्व प्रयत्नांमागे भगवान बिरसा मुंडा यांच्या संघर्ष, निर्धार आणि बलिदानाची प्रेरणा असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## 'साहेब, निर्णय घ्या!' : भुजबळ समर्थकांचे पोस्टर चर्चेत; नाराजी उफाळली

नाशिक (दै. संध्या)




राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना राज्यसभेची उमेदवारी न मिळाल्यानंतर त्यांच्या समर्थकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील येवला शहरात "साहेब, निर्णय घ्या" अशा आशयाचे पोस्टर झळकल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. राज्यसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने राजेंद्र जैन यांना उमेदवारी दिल्यानंतर भुजबळ समर्थकांमध्ये अस्वस्थता वाढल्याचे दिसून येत आहे. अनेक दिवसांपासून भुजबळ यांचे नाव राज्यसभा उमेदवार म्हणून चर्चेत होते. मात्र, अंतिम क्षणी पक्षाने वेगळा निर्णय घेतल्याने समर्थकांनी सार्वजनिकरित्या नाराजी व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे.

## शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही!

**कोल्हापूर (दै. संध्या) :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाविरोधातील आंदोलन आता अधिक तीव्र होताना दिसत आहे. मंगळवारी कोल्हापुरात हजारो शेतकरी, महिला आणि विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढत प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला. आंदोलनात सहभागी झालेल्या महिलांनी "आमचे रक्त सांडले तरी चालेल, पण शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही," असा आक्रमक निर्धार व्यक्त केला. मोर्चात काँग्रेस नेते सतेज पाटील, शेतकरी नेते राजू शेट्टी तसेच छत्रपती शाहू महाराज सहभागी झाल्याने आंदोलनाला मोठे राजकीय आणि सामाजिक बळ मिळाले. मोर्चात ग्रामीण भागातील महिलांची मोठी उपस्थिती होती. महामार्गासाठी जमीन संपादित झाल्यास कुटुंबांचा उदरनिर्वाह धोक्यात येईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. आंदोलनात सहभागी महिलांनी सांगितले की, शेती हीच आमची उपजीविका आहे. जमीन गेल्यानंतर मुलाबाळांचे शिक्षण, विवाह आणि भविष्यातील आर्थिक सुरक्षितता धोक्यात येणार आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हा प्रकल्प स्वीकारला जाणार नाही.

## सासवडच्या नवीन वीर योजनेच्या
# जॅकवेलचे भूमीपूजन संपन्न



वीर धरण : सासवड शहराच्या पाण्याचा प्रश्न कायमचा मिटवणाऱ्या १४३ कोटी रुपयांच्या नवीन 'वीर पाणी पुरवठा योजने'च्या मुख्य जॅकवेलच्या कामाचे भूमीपूजन करताना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप. सोहळ्याप्रसंगी उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, माजी जिल्हाध्यक्ष साकेत जगताप आणि सासवड नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

### २०४० च्या लोकसंख्येचा विचार करून योजनेचे नियोजन

सासवड : (दै. संध्या)

सासवड शहराच्या वैभवात भर घालणारी आणि भविष्यातील पाण्याच्या मुख्य समस्येला कायमचा पूर्णविराम देणारी सुखद वार्ता आहे. सासवड शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी 'नगरोत्थान योजने'अंतर्गत तब्बल १४३ कोटी रुपयांची नवीन 'वीर पाणी पुरवठा योजना' मंजूर झाली आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेच्या मुख्य जॅकवेलच्या कामाचा भव्य भूमीपूजन सोहळा मंगळवारी वीर धरण येथे सासवड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप आणि सर्व नगरसेवकांच्या हस्ते उत्साही वातावरणात पार पडला. सासवड शहराचे झपाट्याने होणारे नागरीकरण आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन अतिशय दूरदृष्टीने या योजनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०४० ची संभाव्य लोकसंख्या डोळ्यासमोर ठेवून हे नियोजन करण्यात आले असून, या माध्यमातून प्रत्येक सासवडकराला दररोज दरडोई १३५ लीटर शुद्ध पाणी पुरवठा केला जाणार आहे.

"ही योजना पूर्ण झाल्यानंतर सासवड शहराला २४ तास आणि अखंडित पाणी पुरवठा करणे शक्य होईल," असा ठाम विश्वास पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. भूतकाळातील आठवणींना उजाळा देत ते म्हणाले की, "यापूर्वी २००३ मध्ये तत्कालीन नगराध्यक्ष चंदुकाका जगताप यांनी पहिली वीर योजना अत्यंत यशस्वीपणे राबवून दाखवली होती. आता त्याच धर्तीवर माजी आमदार संजय जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा करून आणलेली ही दुसरी योजनाही तितकीच दर्जेदार आणि पथदर्शी ठरेल."

तत्कालीन आमदार संजय जगताप यांनी शासनाकडे विशेष वजन वापरून सासवड आणि जेजुरी या दोन्ही ऐतिहासिक शहरांसाठी या कोट्यवधींच्या योजना मंजूर करून आणल्या. याबद्दल नागरिकांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करताना, भाजप युवा मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष साकेत जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी आमदार संजय जगताप यांचे विशेष आभार मानले. यावेळी विरोधकांवर निशाणा साधताना साकेत जगताप म्हणाले, "काही विरोधक पाण्याबाबत सासवडच्या नागरिकांची जाणीवपूर्वक दिशाभूल करत आहेत. त्यांनी वीर धरणावर येऊन प्रत्यक्ष वस्तूस्थितीची पाहणी करावी. या प्रसंगी उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, राजन जगताप, प्रदीप राऊत, नगरसेविका लिना वढणे, अर्चना जगताप, तसेच सुहास जगताप, ॲड. सौरभ वढणे आणि पाणी पुरवठा विभागाचे हनुमंत जाधव यांसह अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि सासवडचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"माजी आमदार संजय जगताप यांनी केलेल्या अथक पाठपुराव्यामुळेच आज सासवडकरांच्या हक्काच्या पाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पहिल्या योजनेप्रमाणेच याही नवीन योजनेचे काम अत्यंत दर्जेदार, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण केले जाईल. सासवडच्या झपाट्याने वाढणाऱ्या विस्ताराचा विचार करता, ही योजना येणाऱ्या पिढ्यांसाठी खऱ्या अर्थाने जीवनदायिनी ठरेल."
**- आनंदीकाकी जगताप**
**(नगराध्यक्षा, सासवड नगरपरिषद)**

### योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये

- अद्ययावत पायाभूत सुविधा: या योजनेत आधुनिक क्षमतेचे पंप हाऊस, शक्तिशाली बुस्टर पंप आणि ६०० एमएम व्यासाची मुख्य जलवाहिनी टाकण्यात येणार आहे.
- पाणी साठवण क्षमता: पांगारे खिंडीत तब्बल २०० एमएलडी (दशलक्ष लीटर) क्षमतेचा विशाल पाणी साठवण तलाव उभारला जाणार आहे.
- शुद्धीकरणाची सोय: पांगारे खिंडीतच एक अत्याधुनिक जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येणार आहे.
- नव्या टाक्यांची निर्मिती: शहराच्या विविध भागांत एकूण ३५ लाख लिटर क्षमतेच्या नवीन पाण्याच्या टाक्या उभारल्या जाणार आहेत. यामुळे पांगारे खिंडीतून थेट शहरातील मुख्य सातही टाक्यांमध्ये पाणी पोहोचवणे अत्यंत सुलभ होणार आहे.

## पंतप्रधानपदाचा चेहरा जाहीर करा, समन्वयकही ठरवा : उद्धव ठाकरे

मुंबई (दै. संध्या)



आगामी लोकसभा निवडणुकांच्या तयारीला लागलेल्या INDIA आघाडीत नेतृत्वाच्या मुद्द्यावरून नवी चर्चा सुरू झाली आहे. विरोधी पक्षांच्या महत्त्वाच्या बैठकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आघाडीसमोर दोन महत्त्वाच्या मागण्या ठेवल्याची माहिती समोर आली आहे. INDIA आघाडीने तातडीने एक सक्षम समन्वयक नियुक्त करावा आणि जनतेसमोर पंतप्रधानपदाचा चेहरा स्पष्ट करावा, अशी भूमिका ठाकरे यांनी मांडल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे. या भूमिकेमुळे विरोधी पक्षांच्या आघाडीत नेतृत्वाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून आगामी राजकीय रणनीतीवर त्याचे परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

2024 च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपविरोधी पक्षांना एकत्र आणण्यासाठी INDIA आघाडीची स्थापना करण्यात आली होती. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उद्धव ठाकरे गट), द्रमुक, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष यांच्यासह अनेक पक्ष या आघाडीचा भाग आहेत. मात्र, स्थापना होऊन अनेक महिने उलटल्यानंतरही आघाडीचा अधिकृत समन्वयक किंवा राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख चेहरा निश्चित करण्यात आलेला नाही. याच मुद्द्यावर उद्धव ठाकरे यांनी बैठकीत भाष्य केल्याचे सांगितले जात आहे.

संत सोपानकाका सहकारी बँक लि., सासवड
(ला.नं.: यु.बी.डी./महाराष्ट्र/१४७१/पी रजि.नं.: पी.एन.ए./बी.एन.के./१०७/१९९७)
नोंदणीकृत कार्यालय : चंदुकाका जगताप सहकार भवन, सी.टी.एस.नं. १६३४, कन्हैया चौक, धान्य बाजार, मु.पो. सासवड, ता. पुरंदर जि. पुणे ४१२३०१. फोन : ०२११५-२९५१०५.
मुख्य/प्रशासकीय कार्यालय :- "सोपानकाका भवन १०३९, शुक्रवार पेठ, टिळक रोड, पुणे ४११००२. फोन : ०२०-२४४४४००१ / २४४४४००२, फॅक्स: ०२०-२४४३३७०१.
Email: headoffice@sopankakabank.com
संस्थापक - चंदुकाका जगताप



जन्म : दि. ११ जून १९४९। मृत्यु : २९ जानेवारी २०१८
सुंदर माझी शाळा अभियान २०२५ - २६
स्व.ना.चंदुकाका जगताप यांच्या जयंती निमित्त
पुणे विभागातील ५ जिल्हे व ५८ तालुक्यांतील माध्यमिक विद्यालयांत राबविलेल्या
संत सोपानकाका सुंदर माझी शाळा अभियान, स्वच्छ व सुंदर शाळा
पारितोषिक वितरण समारंभ
गुरुवार, दि.११ जून २०२६ सकाळी १०.०० वाजता
स्थळ :- आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे
शुभहस्ते
मा.रवींद्रजी चव्हाण साहेब – भाजपा प्रदेश अध्यक्ष
मा.पंकजजी भोयर – राज्यमंत्री शालेय शिक्षण, महा.राज्य
मा.डॉ.राजेंद्रबापू जगताप – प्रधान निदेशक, दक्षिण कमांड पुणे
कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा.संजयजी चंदुकाका जगताप मा.आमदार, पुरंदर-हवेली
प्रमुख उपस्थिती
मा.डॉ.भाऊसाहेब कारेकर – शिक्षण अधिकारी (माध्यमिक) पुणे जिल्हा परिषद पुणे
मा.आनंदीकाकी जगताप – नगराध्यक्षा, सासवड नगरपरिषद
मा.रमणिकलाल कोठडिया – अध्यक्ष, संत सोपानकाका सह. बँक लि., सासवड
मा.चंद्रकांत पाटील – अध्यक्ष, मुंबई सेकंडरी को.ऑप.क्रे.सोसा.
प्राचार्य डॉ. निवेदिता गजानन एकबोटे – प्राचार्या, मॉर्डन कॉलेज पुणे,नगरसेविका, पुणे मनपा
मा.दशरथ सगरे – संस्थापक,यशोदा टेक्निकल कॅम्पस, सातारा
मा.गणपतराव बालवडकर – संस्थापक अध्यक्ष, श्री खंडेराय प्रतिष्ठान, बालेवाडी
मा.बंडोपंत कुलकर्णी – सेक्रेटरी मॉर्डन एज्युकेशन सोसायटी. वीटा, सांगली
मा.प्रदीप वळसे पाटील – अध्यक्ष, श्री निरगुडेश्वर शिक्षण विकास मंडळ, निरगुडसर
मा.सुभाष माने – मा.अध्यक्ष, माध्य. व उच्च माध्य.शाळा मुख्याध्यापक महामंडळ, महाराष्ट्र राज्य
मा.अरुण थोरात – मा.अध्यक्ष, माध्य. व उच्च माध्य.शाळा मुख्याध्यापक महामंडळ, महाराष्ट्र राज्य
मा.दादासाहेब लाड – तज्ञ संचालक, कोल्हापूर जिल्हा माध्य. शिक्षक पतसंस्था कोल्हापूर
मा.तानाजी माने – अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य.शाळा मुख्याध्यापक संघ
मा. चंद्रकांत जाधव – अध्यक्ष, सातारा जिल्हा माध्य. व उच्च माध्य. शाळा मुख्याध्यापक संघ
मा.प्रसाद गायकवाड – अध्यक्ष, पुणे जिल्हा माध्य. व उच्च माध्य. शाळा मुख्याध्यापक संघ
मा.राहुल पवार – अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा माध्य. व उच्च माध्य.शाळा मुख्याध्यापक संघ
मा.संजयकुमार झांबरे – अध्यक्ष , सांगली जिल्हा माध्य. व उच्च माध्य.शाळा मुख्याध्यापक संघ
मा.सतीशभाऊ उरसळ – अध्यक्ष, पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळ, वाघापूर
मा.प्रकाशदादा पवार – अध्यक्ष, व्यवस्थापन समिती संत सोपानकाका सह. बँक लि., सासवड
मा.राजेश गायकवाड – कार्याध्यक्ष, पुणे जिल्हा माध्य. व उच्च माध्य.शाळा मुख्याध्यापक संघ
मा.आर.वाय. पाटील – सचिव, कोल्हापूर जिल्हा माध्य. व उच्च माध्य.शाळा मुख्याध्यापक संघ
मा.विलास किरवे – अध्यक्ष, समाज शिक्षण मंडळ
मा.शिवाजी कामथे – सचिव, पुणे जिल्हा माध्य. व उच्च माध्य.शाळा मुख्याध्यापक संघ
मा.दत्तात्रय गवळी – सहसचिव, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड
योजना समन्वयक : श्री.नंदकुमार सागर (९८५०५०१०१९) श्री.सुधाकर जगदाळे श्री.वसंतराव ताकवले श्री.दिलीप साबणे श्री.अनिल उरवणे श्री.रवींद्रपंत जगताप श्री.चंद्रशेखर जगताप श्री.विश्वजीत आनंदे श्री.सतीश शिंदे श्री.कुंडलीक मेमाणे श्री.रामप्रभू पेटकर श्री.दत्तात्रय रोकडे श्री.संदीप टिळेकर श्री.राजेंद्र जाधव
आपले नम्र :- संत सोपानकाका फाऊंडेशन | संत सोपानकाका सुंदर माझी शाळा अभियान समिती

# संपादकीय

एव्हरेस्ट शिखरावर ऑक्सिजन संपल्यानंतरही सहा दिवसांनी जिवंत सापडलेल्या एका शेरपाच्या जिद्दीच्या कहाणीनं सध्या संपूर्ण जगभरात आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. ही कहाणी आहे दावा शेरपा या ५७ वर्षांच्या हिंमतवान आणि अनुभवी मार्गदर्शकाची. एव्हरेस्ट शिखर सर केल्यानंतर परतताना आपल्या पथकापासून ते वेगळे झाले होते. सोबतचा ऑक्सिजन संपलेला, प्रचंड कडाक्याची थंडी, शून्याच्याही कितीतरी खाली तापमान, खायला अन्नाचा कण नाही की प्यायला पाण्याचा थेंब नाही.. जिथे रक्तही अक्षरश: गोठतं, अशा ठिकाणी इतका काळ जिवंत राहणं शक्यच नाही..

## एव्हरेस्टवर मृत्यूला भेटून 'जिवंत' परतलेला शेरपा

सगळ्यांना वाटलं, दावा शेरपांनी एव्हरेस्टच्या त्या बर्फाळ रांगांतच शेवटचा श्वास घेतला.. दु:खद अंतकरणानं कुटुंबीयांनीही दावा शेरपा यांच्या अंतिम संस्कारांची तयारी सुरू केली, पण हा शेरपा कुठल्याही परिस्थितीत हार मानणारा नव्हता.. इतकी विपरीत परिस्थिती असतानाही त्यानं आपली हिंमत कायम ठेवली आणि मृत्यूवर अक्षरश: मात करून तो पुन्हा जिवंतपणी परतला! आपल्या टीमपासून दुरावल्यानंतर दावा शेरपा रस्ता चुकल्यानं 'हरवला' असं मानलं जात होतं, पण जिवंत परतल्यावर दावा शेरपांनी सांगितलं, माझ्याच 'घरात' मी हरवेन कसा? माझ्याकडचा ऑक्सिजन संपला होता, त्यामुळे मी मागे पडलो आणि नंतर एव्हरेस्ट आणि निसर्गानंही माझी परीक्षा पाहिली. दावा शेरपा सांगतात, माझ्याकडचा ऑक्सिजन संपल्यावर मला चालता येईनासं झालं. पहिले दोन दिवस माझ्या पोटात अन्नाचा कणही नव्हता. त्यानंतर मी बर्फ चघळायला सुरुवात केली. नंतर मला खिशात काही चॉकलेट सापडले. ते मी पुरवून पुरवून खाल्ले. बर्फ वितळवून थोडं पाणीही प्यालो. ऑक्सिजन नाही, खायला-प्यायला काहीच नाही, शक्ती संपत आलेली, अशाही स्थितीत केवळ जिद्दीच्या बळावर ते हळूहळू खाली उतरत होते. मात्र, नंतर ते एका दरीत पडले आणि सुमारे अडीच दिवस तिथेच अडकून राहिले. बाहेर पडण्याचा कोणताच मार्ग त्यांना दिसत नव्हता. आता आपण जिवंत राहत नाही, याची त्यांनाही आता जवळजवळ खात्री झाली, पण हिंमतवान माणसाला मार्ग सापडतातच. त्यानंतर अचानक हिमस्खलन झालं. त्यातूनही त्यांनी स्वत:ला वाचवलं, पण त्यामुळे दरीत बर्फ साचू लागला. त्या बर्फावर पाऊल ठेवत ते उभे राहिले. वर पाहिलं आणि पहिल्यांदाच त्यांना वाटलं की, मी इथून बाहेर पडू शकतो! झालंही तसंच! महत्प्रयासानं ते दरीबाहेर आले. बाहेर आल्यानंतर त्यांना जवळच दोरखंड सापडला. त्याच्या मदतीनं जगातील या सर्वोच्च पर्वतावरून ते पुन्हा खाली उतरू लागले. मात्र, त्यादरम्यान पुन्हा एकदा हिमस्खलन झालं. त्यामुळे त्यांच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण झाले, पण जगण्याची त्यांची हिंमत आता आणखी वाढलेली होती. बर्फ ओलांडत ते खाली जात राहिले. संपूर्ण रात्र ते चालत होते. बेस कॅम्पजवळ पोहोचले. जवळपास एका आठवड्यानंतर प्रथमच एखादा माणूस त्यांना दिसला. कचरा वेचणाऱ्यांची एक टीम तिथे होती. त्यांनी मग दावा शेरपा यांना खाली आणलं. त्यांना फ्रॉस्टब्राइट झालेले होते. इतके दिवस काहीही खाल्लं-प्यालं नसल्यामुळे प्रचंड अशक्तपणा आला होता. डिहायड्रेशन झालं होतं. ज्याच्या अंत्यसंस्काराची तयारी सुरू केली होती, तो आपला नवरा जिवंत आहे, हे पाहिल्यावर त्यांच्या पत्नीच्या आनंदाश्रूंनाही मग अंत राहिला नाही!..



## संस्कृत सुभाषित

काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।
व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा।।

अर्थ – बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

## गुरु वचन

### भक्ती मार्ग सर्वोत्कृष्ट

विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे तीन मार्ग आहेत – ज्ञान, कर्म व भक्ती. वास्तवात हेच ज्ञान आहे, ज्याद्वारे आपण ईश्वर कोण आहे? हे जाणतो. ज्ञान आपल्या मेंदूत साठवले जाते व याद्वारेच आपण ईश्वर प्राप्त करतो. मानवाचा मेंदु छोटा असतो, मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसे जाणतो? हा प्रश्न निर्माण होतो. खरंतर मेंदूत असलेल्या ज्ञानातूनच हे शक्य होते. ज्ञानामुळे मन सुद्धा तृप्त होते. श्रीआनंदमूर्ती यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव असते तोपर्यंत त्याने ज्ञानार्जन करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर तुमच्या ज्ञान ग्रहण करण्याची भूख मिटते कारण तोपर्यंत तुमचे ध्येय ईश्वराला प्राप्त करणे असते.

काही विद्वानांनुसार, कर्मातूनच ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मानव एक क्षण जिवंत राहू शकत नाही म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत श्रीकृष्णाने मानवास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे धार्मिक व अध्यात्मिक जगतात जेवढी ज्ञानाला किंमत असते, तेवढीच कर्माची असते. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ मनाने ईश्वराची भक्ती केल्यास ईश्वर प्राप्ती अवघड नाही. खरंतर भक्तीच एकमेव मार्ग आहे, ज्यावर मोठ–मोठ्या ज्ञानींनी वाटचाल केली आहे. आपण सर्व मानतो की, संपूर्ण चराचराची निर्मिती ईश्वरानेच केली आहे.

म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचीच संतान आहे. जर तुम्ही परमात्म्यास प्रसन्न करु इच्छित असाल तर प्रत्येक जीवाप्रती प्रेम–भाव बाळगा. यासाठी तुम्हाला मानव सेवा, समाज सेवा आणि निराधारांना आधार दिला पाहिजे. मानव सेवा करताना नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. वास्तवात हीच भक्ती आहे. यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव जागृत झाला तर तुम्हाला ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.

## उपदेशकथा

### थोडक्यात गोष्टी

हॅरॉल्ड मॅकमिलन इंग्लंडचे पंतप्रधान होते. एकेकाळी मुंबईला त्यांचा एकदा भारतीय विद्याभवनात गौरव करण्यात आला. त्यांनी भाषणात एक गोष्ट सांगितली होती. इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्समध्ये प्रथा आहे की, कुणाही नवीन सदस्याचे पहिले भाषण (मेडन स्पीच) होईल तेव्हा खुद्द पंतप्रधानांनी उठून त्याला शाबासकी द्यावी आणि म्हणावे, 'थोरल्या पिटपासून (हा इंग्लंडचा पहिला पंतप्रधान) आजतागायत एवढं सुंदर भाषण कुणी केलं नव्हतं!' मॅकमिलन पुढे म्हणाले, 'मात्र, त्या सदस्याला बोलावून मी खासगीत सांगत असे की, पहिल्याच वा एकाच भाषणात एवढे मुद्दे कोंबू नयेत. सभासदानं एकच मुद्दा घेऊन विवरण करावं. मंत्र्यांनं दोन मुद्दे घेऊन, आणि तीन मुद्दे ही पंतप्रधानपदाची मिरास. तुमच्या प्रतिपादनाकडे सर्वांचं लक्ष वेधून घ्यायचे असेल तर लांबण न लावता एकच मुद्दा लावून धरा!'

कथा उपदेश : थोडक्यात बोला, विषयाला धरून बोला नि खाली बसा.

## पंचांग

| | |
|---|---|
| १० जून २०२६ | योग:आयुष्मान |
| बुधवार | ०६:२९:३४ |
| विक्रम संवत्– २०८२ | योग:सौभाग्य |
| अधिक ज्येष्ठशके | २८:०२:३३+ |
| संवत्– १९४८ | करण:वणिज १३:५२:२४ |
| संवत्सर –पराभवनाम | करण:विष्टि २४:५८:०३+ |
| अयन– उत्तरायणारंभ | सूर्य:वृषभ |
| मास–अधिक ज्येष्ठ | चन्द्र:मीन |
| ऋतु– सौर ग्रीष्म | हिजरी सन् – १४४७ |
| कृष्ण पक्ष | मुस्लिम मास – जिल्हेज |
| तिथि:दशमी २४:५८:०३+ | तारीख – २४ |
| नक्षत्र:उत्तराभाद्रपद | विशेष |
| ०९:२१:१५ | जागतिक दृष्टिदान दिन |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९७५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | | 4 | | | | | 6 |
| | 4 | | 8 | | | 1 | | |
| | | | 6 | 9 | 7 | | 5 | 3 |
| 6 | 7 | 8 | | | | | | 1 |
| 1 | | 4 | 9 | | 6 | 2 | | 7 |
| 2 | | | | | | 5 | 6 | 4 |
| 3 | 8 | | 7 | 6 | 2 | | | |
| | | 7 | | | 1 | | 3 | |
| 4 | | | | | 9 | | 1 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९७४ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | 6 | 4 | 7 | 9 | 3 | 2 | 8 |
| 7 | 8 | 9 | 6 | 2 | 3 | 1 | 4 | 5 |
| 3 | 2 | 4 | 8 | 5 | 1 | 9 | 7 | 6 |
| 4 | 9 | 7 | 3 | 6 | 2 | 5 | 8 | 1 |
| 6 | 5 | 1 | 9 | 4 | 8 | 2 | 3 | 7 |
| 2 | 3 | 8 | 5 | 1 | 7 | 6 | 9 | 4 |
| 9 | 6 | 2 | 1 | 8 | 4 | 7 | 5 | 3 |
| 8 | 7 | 5 | 2 | 3 | 6 | 4 | 1 | 9 |
| 1 | 4 | 3 | 7 | 9 | 5 | 8 | 6 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### अंतरराष्ट्रीय

- २००६ – ऐतिहासिक दांडी मार्गाला सरकारने राष्ट्रीय ठेव्याचा दर्जा दिला.
- २००६ – आंध्र प्रदेशच्या महबुबनगर जिल्ह्यातील पोलकापल्ली गावात दोन गटात झालेल्या आपसातील वादातून एकाच कुटुंबातील १३ जणांना जिवंत जाळले.
- २००७ – मणिपुरमध्ये जातीय हिंसाचारात १५ ठार.
- २००७ – आयफामध्ये 'रंग दे बसंती' ला उत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार.
- २००७ – आशियाने आफ्रो–आशिया चषक ३–० ने जिंकला.

### राष्ट्रीय

- २००८ – मुंबईसह महाराष्ट्रात मराठी पाट्या असाव्यात या मागणीला महाराष्ट्र सरकारने हिरवा कंदील दाखवला.

### जन्म

- १९०८ – जनरल जयंतनाथ चौधरी, भारतीय लष्करप्रमुख.
- १९३८ – राहुल बजाज, भारतीय उद्योगपती.

### निधन

- २००६ – सपा नेते अरविंद यादव यांचे अपघाती निधन
- १९०३ – लुइगी क्रेमॉना, इटालियन गणितज्ञ.
- २००१ – फुलवंतीबाई झोडगे, सामाजिक कार्यकर्त्या.
- २००७ – क्रिकेटपटू सुभाष दिक्षितची आत्महत्या.

## : SMS :

Ye 1 Naya SMS hai jo Market main abhi tak nahi aaya. Kaha na, Market main abhi tak nahi aaya. To Mobile main kese aayega?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.९ | २५.८ |
| अहमदनगर | ३६.५ | २४.९ |
| अकोला | ४५.३ | ३२.४ |
| अमरावती | ४३.६ | ३२.१ |
| बीड | ४६.५ | ३३.८ |
| भंडारा | ४५.८ | ३१.९ |
| बुलढाणा | ४४.४ | २९.७ |
| चंद्रपूर | ४५.९ | ३२.८ |
| चेन्नई | ४२.५ | ३४.१ |
| नवी दिल्ली | ४४.३ | ३४.४ |
| धुळे | ४४.२ | २९.७ |
| गोंदिया | ४४.४ | ३२.४ |
| जळगाव | ४५.३ | ३०.३ |
| कोल्हापूर | ३१.७ | २४.६ |
| लातूर | ३७.९ | २६.३ |
| मुंबई | ३९.७ | ३५.२ |
| नागपूर | ४४.६ | ३२.७ |
| नांदेड | ४२.७ | ३०.४ |
| नंदूरबार | ४०.२ | २६.८ |
| नाशिक | ३८ | २५.४ |
| पुणे | ३३.७ | २४.४ |
| पंढरपूर | ३८.३ | २६.६ |
| सातारा | ३३.९ | २५.१ |
| सांगली | ३४.१ | २५.३ |
| सोलापूर | ३८ | २६.७ |
| वर्धा | ४६.१ | ३३.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: दक्षिण घरातील ज्येष्ठांचा सल्ला अवश्य घ्या. मोठे घबाड मिळवून देणाऱ्या ठरतील.

**तुळ :** शुभ रंग :केसरी, शुभ दक्षिण : औषधपाण्याची पथ्ये पाळून शारीरिक तंदुरुस्ती नीट राखता येईल.

**वृषभ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण आपले जुने मित्र भेटतील. गतकाळातील आठवणींना उजाळा मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम सरकारी नोकरदारांना घरगुती प्रश्नासाठी जास्तीत जास्त वेळ काढावा लागेल.

**मिथुन :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व एखादे शासकीय प्रकरण, चुकीचा सल्ला, व्यसनी मित्रांची संगत यातून वेळीच सुखरूप बाहेर पडण्याचा प्रयत्न करा.

**धनु :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम पैशाचा वाढता ओघ कामाचे प्रमाणही वाढविणारा ठरेल.

**कर्क :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व उगाच निरर्थक प्रश्नात वेळ जाणे शक्य. राग आणि त्रागा याला स्थान देऊ नका.

**मकर :** शुभ रंग: निळा , शुभ दिशा: पूर्व नोकरीच्या ठिकाणी छोट्या छोट्या कारणांनी हताश होऊ नका. राग आणि त्रागा याला स्थान देऊ नका.


**सिंह :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पश्चिम रोकड, मौल्यवान वस्तू, महत्त्वाची कागदपत्रे इ. चोरी, हरवणे किंवा नैसर्गिक कारणांनी नुकसानीत जाणार नाही हे पहा.

**कुंभ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पूर्व नोकरीच्या ठिकाणी छोट्या छोट्या कारणांनी हताश होऊ नका. राग आणि त्रागा याला स्थान देऊ नका.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व आपले जुने मित्र भेटतील. वैवाहिक साथीदाराच्या काही चुका उदार मनाने सोडून द्या.

**मीन :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: दक्षिण विवाहविषयक बैठका यशस्वी होतील. आजोळच्या काही शुभवार्ता मन उल्हसित करतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९७५



### आडवे शब्द

१. पांडवांपैकी धाकटे दोघे
६. 'ने मजसी ने परत मातृभूमीला' या गीताचे स्वातंत्र्यवीर कवी
९. उत्तीर्ण
११. गोव्यातील शंकराचे रूप
१३. आंब्याची पोळी
१४. पुत्र
१५. छोटासा
१७. अस्थिर संपत्ती
१८. बांबू
१९. दारूचा एक प्रकार
२०. मोठा (भाऊ)
२२. बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
२३. पदार्थाच्या पृष्ठभागावरील तुकडा
२६. वाळवी, उणीव
२८. झाकणाचे पात्र
३०. अजाणता
३१. श्रीरामाची जीवनगाथा
३२. कौतुक
३३. होकारार्थी विचारसरणी
३४. तफावत, फरक
३५. दूर गेलेला, वंचित
३६. लाजणारा
३८. लहान वस्ती
३९. पंकज, कमळ
४१. दोरा
४२. 'खरखरीत'च्या विरुद्ध
४४. संगीतातील एक राग
४६. जपजाप्य
४८. कोवळी फांदी
५०. विषमाच्या विरुद्ध
५२. पद्धत
५३. चूकच्या विरोधार्थी शब्द
५६. कंपासमधील दोन टोकांचे साधन
५९. किंमत
६०. कपाळ
६१. गरीब मनुष्य
६२. न टिकणारे, हलक्या प्रतीचे
६३. कोकणी बेत
६५. एक तारवाद्य
६७. च्या बरोबर
६८. दुर्दशा
६८अ. धाव (इंग्रजी)
७०. भांडण
७३. लोणकढी थाप
७४. गेरू
७५. चोपणी, बडविण्याचे हत्यार
७७. श्रम, कष्ट
७९. वदंता, आवई
८०. सुरसुरी, ताव
८१. नवे कोरे
८२. उत्सव

### उभे शब्द

१. वठवलेले सोंग
२. छोटे मोठे
३. शंकर
४. परमेश्वर
५. छत आणि भिंतीमधील जागा
६. बरोबर
७. रसपूर्ण
८. वटवट, त्रास
९. दिल्लीचा विमानतळ
१०. नातेवाईक
१२. घोड्याचे लोखंडी पायताण
१४. लाजून मान वळवणे
१६. तात्पर्य
१८. ललाट
२१. आवडता, प्रिय
२२. पवित्र
२४. वरवधूची मिरवणूक
२५. खाणीमध्ये काम करणारा मजूर
२६. विद्या
२७. बारीक अंगकाठी
२९. बारा स्वरांची मालिका
३०. नकला करणारा
३३. जिवलग
३४. अर्थसंकल्प
३७. ढीग
३८. कडक व चिवट
४०. प्रत्येक दिवशी
४२. गुलाबपाणी शिंपडण्याचे साधन
४३. फुलांचा राजा
४४. बागकाम करणारा
४५. दिवस
४७. पारखी
४९. मोठी टोपली
५१. मध
५४. इटलीची राजधानी
५५. शुष्क, उजाड
५६. शिखराचे टोक
५७. दृष्टी, नजर
५८. विद्वान स्त्री
६२. आजीवन
६३. गेले वर्ष
६४. भाजीपाला
६६. स्पष्ट, सडेतोड
६७. मनाला टोचणारे दु:ख
६९. वधू
७०. भिजवलेले गव्हाचे पीठ
७१. प्रयत्न
७२. ब्राह्मण
७४. भांडण
७६. सारा पण सगळा नव्हे!
७८. निरूपयोगी गवत

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ९७४ चे उत्तर

आडवे उत्तर १. नवकोटनारायण ८.समा १०.कासावीस १३.लालनपालन १५.दलाल १६.मागोमाग १८.कान १९.व्रण २०.नवा २१.जणगणना २३.राजीव २५.नाक २६.पतन २८.सदरा २९.सबला ३१.नवरानवरी ३५.यथावकाश ३६.मन ३७.वच ३९.मण ४०.खर ४१.मंथन ४२.महाराज ४५.रणरण ४६.दार ४८.मलमल ४९.पार ५०.मत ५१.रमा ५३.पवन ५५.जवळ ५७.खाजरा ५८.सागरतट ६०.क्षमा ६१.रातसार ६४. रम ६५.पत्र ६६.रात ६७.अंत ६८.सट्टा ६९.जवाहीर ७१.लाज ७२.कवायत ७३.कलर ७४.वारा ७६.मानपान ७८.रान ८०.सपीट ८१.साम नावीर ८२.सट ८३.मळभ

उभे उत्तर : १.नगदनारायण २.कोयल ३.नारायण नारायण ७.यजमान ८.सलग ९.मान १०.काल ११.सान १२.समान १३.लामा १४.पावन १७.गोवा १८.काना २१. जननमरण २२.गजरा २४.वसन २६.पलाश २७.पारी २९.सव ३०.बकासूर ३२.वन ३३.नवलाई ३४.वचन ३८.चहा ३९.मजलदरमजल ४०.खरबूज ४१.मंदार ४२.मधुर ४३.राम ४४.बोलपट ४७.सुतराम ४९.पाळत ५०.मज ५२.मासा ५४.नक्षत्र ५६.वरात ५७.खार ५९.गर ६२.सागवान ६३.आसपास ६५.परवाना ६६.राजमा ६७.अंतराळ ७०.वारसा ७२.कपाट ७३.कट ७५.रावी ७७.नस ७९.नभ

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार कायदा; सक्षम पणन सुधारणांचा नवा अध्याय

## शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी मुंबई आणि नागपूर राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अस्तित्वात

**मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनात राज्यातील पणन व्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन घडवणारा राष्ट्रीय महत्वाचा बाजार (Market of National Importance) कायदा हिवाळी अधिवेशनात संमत झाल्यानंतर आता मुंबई आणि नागपूर कृषी उत्पन्न बाजार समित्यांना 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' घोषित करण्यात आले आहेत. कायद्यानुसार पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दोन्हीही राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला आहे. हा कायदा राज्यातील पणन व्यवस्था अधिक पारदर्शक, स्पर्धात्मक आणि अत्याधुनिक संसाधनांनी सुसज्ज करण्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.**

■ बी.सी.झंवर, विभागीय संपर्क अधिकारी ■

शेतकरी हित, बदलती अत्याधुनिक पणन व्यवस्था, वेगाने पुढे जाणारी जागतिक अर्थव्यवस्था आणि आधुनिक कृषी व्यापाराच्या गरजा लक्षात घेतल्या तर हा कायदा काळाची गरज असून सक्षम पणन सुधारणाचा नवा अध्याय आहे असे या कायद्याच्या उद्देशातून स्पष्टपणे दिसून येते.

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा इतिहास शंभर वर्षांहून अधिक जुना आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा 1963 मध्ये अस्तित्वात आला. कोणताही कायदा कायमस्वरूपी अपरिवर्तनीय नसतो. बदलत्या काळानुसार, तंत्रज्ञानानुसार आणि बाजारपेठेच्या गरजेनुसार त्यामध्ये सुधारणा कराव्याच लागतात. कृषी पणन क्षेत्रातील सुधारणांचा प्रवास पारंपरिक बाजार समित्यांपासून खासगी बाजारांपर्यंत झाला आणि आता त्याच सुधारणांचा पुढील टप्पा म्हणजे जागतिक पणन व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अत्याधुनिक पणन व्यवस्था असलेला 'राष्ट्रीय महत्वाचा बाजार' ही संकल्पना आहे.

या सुधारणांची बीजे 2024-05 पासून पेरली गेली. त्यानंतर 2017-18 मध्ये केंद्र सरकारने राज्यांना दिल्लीतील आझादपूर मंडीच्या धर्तीवर राष्ट्रीय स्वरूपाच्या बाजारपेठा विकसित करण्याची सूचना केली होती. विविध राज्यांतून मोठ्या प्रमाणावर कृषी मालाची आवक होणाऱ्या बाजार समित्यांसाठी स्वतंत्र रचना तयार करण्याचा मसुदाही राज्यांना पाठविण्यात आला होता.

सध्याच्या बाजार समित्यांची रचना प्रामुख्याने स्थानिक प्रतिनिधित्वावर आधारित आहे. ज्या भागातून शेतीमालाची आवक होते त्या भागातील शेतकरी प्रतिनिधी निवडणुकीतून बाजार समितीवर निवडून येतात. परंतु मुंबई, नागपूर, नाशिक किंवा पुणे यासारख्या मोठ्या बाजारांमध्ये अनेक राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येतो. अशा परिस्थितीत केवळ स्थानिक प्रतिनिधित्व पुरेसे ठरत नाही. त्या बाजाराशी संबंधित इतर राज्यांतील शेतकरी आणि व्यापार घटकांचे व्यापक प्रतिनिधित्व गरजेचे आहे. पणन हा राज्य सूचीतील विषय असल्यामुळे परराज्यातील शेतकरी प्रतिनिधींना निवडणुकीद्वारे बाजार समितीवर आणणे शक्य नाही. ही मर्यादा दूर करण्यासाठी राष्ट्रीय बाजार कायद्यात नामनिर्देशित संचालक मंडळाची तरतूद करण्यात आली आहे. केंद्र सरकारनेही मोठ्या बाजारांसाठी तज्ज्ञ, अधिकारी, व्यापारी, शेतकरी प्रतिनिधी आणि इतर राज्यांतील सदस्यांचा समावेश असलेले संचालक मंडळ स्थापन करण्याची शिफारस केली होती.

त्याच अनुषंगाने राष्ट्रीय बाजारांमध्ये निवडणुका न घेता पणन मंत्री अध्यक्ष, पणन राज्यमंत्री उपाध्यक्ष, तसेच वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी, पणन संचालक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, व्यापारी प्रतिनिधी, अपेडा, शेतकरी प्रतिनिधी आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेले संचालक मंडळ नियुक्त केले जाणार आहे. या मंडळाच्या माध्यमातून मोठ्या बाजारांचे व्यवस्थापन अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी परिणामकारक आणि राष्ट्रीय स्तरावरील गरजांशी सुसंगत होईल.

राष्ट्रीय महत्वाचा बाजार म्हणून निवड होण्यासाठीही विशिष्ट निकष ठेवण्यात आले आहेत. किमान 80 हजार टन कृषी मालाची वार्षिक आवक असणे आणि किमान दोन राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे आशिया खंडातील सर्वात महत्त्वपूर्ण कृषी उत्पन्न बाजार समिती समजल्या जाणाऱ्या मुंबई व विदर्भातील अत्यंत महत्त्वपूर्ण असलेली कृषी उत्पन्न बाजार समिती नागपूर यांसारख्या मोठ्या बाजार समित्यांचे राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारात रूपांतर करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे व्यापक हित जोपासले जाणार आहे.

आज बाजार समित्यांना शंभर वर्षांहून अधिक काळ झाला असला तरी त्यांतील व्यवहारांची वाढ अपेक्षित प्रमाणात झालेली दिसत नाही. शेतमालाचे दर, सुविधा, पायाभूत व्यवस्था, अतिक्रमण, पारदर्शकता याबाबत अनेक तक्रारी सातत्याने होत असतात. अनेकदा निवडून आलेल्या संचालक मंडळांच्या अधिकारांनाही मर्यादा असतात. आता राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचा दर्जा देण्यात आणि याचे अध्यक्ष थेट पणन मंत्री असल्याने बाजार समितीच्या कामकाजावर शासनाचा नियंत्रण राहणार आहे. यामुळे प्रशासनात अधिक पारदर्शकता आणि वेगवान कार्यक्षमता निर्माण होईल. मोठ्या बाजारांमध्ये पणन मंत्री, पणन संचालक आणि तज्ज्ञ सदस्यांचा थेट सहभाग असल्यास धोरणात्मक निर्णय अधिक वेगाने घेता येतील, पायाभूत सुविधा जलद विकसित करता येतील आणि विविध राज्यांतील व्यापाऱ्यांची स्पर्धा वाढवून शेतकऱ्यांना स्पर्धात्मक दर मिळवून देता येतील. बदलती अर्थव्यवस्था, वाढती जागतिक स्पर्धा, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि निर्यातक्षम फळे व भाजीपाल्याचे उत्पादन या सर्व बाबी लक्षात घेता, या क्षेत्रात मूलभूत सुधारणांची गरज निर्माण झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन सातत्याने शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून राज्याची कृषी आणि विपणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी हिताचे निर्णय घेत आहे. पणन मंत्री म्हणून जयकुमार रावल यांनी जबाबदारी स्वीकारल्यानंतर कालसुसंगत, शेतकरी-केंद्रित आणि स्पर्धात्मक पणन रचना उभारण्यासाठी नियोजनपूर्वक दूरगामी पावले उचलली आहेत.या कायद्यामागील मुख्य उद्देश म्हणजे शेतमालाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारी आधुनिक पणन व्यवस्था निर्माण करणे हा आहे. अत्याधुनिक संसाधनांनी युक्त अशा राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारपेठा उभारून त्यामार्फत शेतमाल जलद पुरवठा साखळीने महामुंबई इंटरनॅशनल ॲग्रीकल्चर मार्केटशी जोडला जाणार आहे. पॅरिस येथील रुंगीस आंतरराष्ट्रीय मार्केटच्या धर्तीवर वाढवण बंदराजवळ सुमारे 1200 एकर क्षेत्रावर जागतिक दर्जाचे बाजार केंद्र उभारण्याचा सरकारचा मानस आहे. त्यादृष्टीने शासन पावले उचलत आहे.

या इंटरनॅशनल मार्केटच्या माध्यमातून ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग, मार्केटिंग, लॉजिस्टिक सुविधा व जलद पुरवठा साखळीच्या माध्यमातून राज्यात उत्पादित फळे, भाजीपाला व इतर शेतमाल अवघ्या 12 ते 14 तासांत आंतरराष्ट्रीय बाजारात पोहोचवणे शक्य होणार असून, त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगले आणि स्थिर दर मिळतील.

राष्ट्रीय महत्वाचा बाजार ही केवळ प्रशासकीय सुधारणा नसून राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. बदलत्या जागतिक स्पर्धेच्या युगात शेतकऱ्यांना अधिक बाजारपेठा, अधिक स्पर्धात्मक दर आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा सुधारणांची आवश्यकता आहे. त्यामुळे या कायद्याकडे शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन हिताच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या कृषी पणन व्यवस्थेला नवे बळ देणारा आणि भविष्यातील बाजारपेठांसाठी सक्षम बनवणारा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### येत्या सोमवारपासून रोटेशन पद्धतीने (एक दिवसाआड) पाणीपुरवठा होण्याची शक्यता

■ महापौर मंजुषा नागपुरे यांनी दिले एक दिवसाआड पाणीपुरवठ्याचे संकेत

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यात पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने सोमवारपासून रोटेशन पद्धतीने पाणीकपात लागू होण्याची शक्यता आहे. महापौर मंजुषा नागपुरे यांनी यासंदर्भात नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. महापौर यांनी सांगितले की, प्रशासनाला याबाबत नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पुणेकरांना आता एक दिवसआड पाणीपुरवठा होणार हे अटळ आहे. सध्या उन्हाळ्यामुळे पाण्याची मागणी वाढली असून, धरणातील पाणीसाठा कमी झाल्याने महापालिकेला कपातीचा निर्णय घ्यावा लागण्याची शक्यता आहे. महापौर नागपुरे यांनी सांगितले की, पाणीपुरवठा एक दिवसाआड करावा लागेल अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक पाण्याचा वापर टाळावा आणि पाण्याची साठवणूक करून ठेवावी. गेल्या काही महिन्यांपासून पुण्यातील कात्रज, कोंढवा, सिंहगड रोड, धायरी, सनसिटी, वडगाव बुद्रुक, हिंजवडी या भागांमध्ये आठवड्यातून एक दिवस पाणीकपात सुरू आहे. आता शहरभरात ही कपात वाढण्याची शक्यता आहे. महापालिकेने यापूर्वीही रोटेशन पद्धतीने पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे २५% पाण्याची बचत होते. महापालिका प्रशासन लवकरच क्षेत्रनिहाय वेळापत्रक जाहीर करण्याची शक्यता आहे. तोपर्यंत पुणेकरांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेत महापौर यांच्या सोबत उपमहापौर परशुराम वाडेकर, सभागृह नेते गणेश बिडकर, आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप उपस्थित होते.

### पावसाळ्यापूर्वी खोदाई, नाले साफसफाईची कामे पूर्ण करा; कांग्रेसचा आंदोलनाचा इशारा

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहरात MNGL, मोबाईल कंपन्या, महावितरण, महाप्रीत, आपत्ती व्यवस्थापन आणि २४x७ पाणी पुरवठा विभागाच्या खोदाईच्या कामांमुळे रस्ते आणि फुटपाथची दुरवस्था झाली आहे. एप्रिल २०२६ अखेर ही कामे पूर्ण होणे अपेक्षित असताना जून अखेरपर्यंतही ती सुरू असल्याचा आरोप काँग्रेस ने केला आहे. ऋषिकेश (आबा) बालगुडे यांनी महापालिका आयुक्तांना पत्र लिहून पावसाळ्यापूर्वी रस्ते, फुटपाथ दुरुस्ती आणि नाले साफसफाईची कामे पूर्ण करण्याची मागणी केली आहे. पुणे ग्रँड सायकल स्पर्धेच्या वेळी नव्याने केलेले रस्ते-फुटपाथही खोदण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. २ मार्च २०२६ रोजीही याबत लेखी पत्र देऊनही महापालिकेच्या पथ, पाणी पुरवठा आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने खासगी कंपन्यांना पाठीशी घालून करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी केली, असा आरोप पत्रात आहे. शहरातील नाल्यांची साफसफाई न झाल्यास दरवर्षीप्रमाणे पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊन नागरिकांच्या घरात आणि दुकानात पाणी शिरून नुकसान होण्याची शक्यता आहे. आजही नाले आणि परिसरातील राडारोडा तसाच असल्याचे विविध माध्यमांतून समोर येत आहे. पावसाळ्यात नाले तुंबून नुकसान झाल्यास त्यासाठी महापालिका अधिकारी आणि संबंधित ठेकेदारांना जबाबदार धरून कारवाई करावी. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा बालगुडे यांनी दिला आहे. महापालिका आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### 31 जुलैपर्यंत 3.561 टीएमसी आवश्यक

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीतील चारही धरणांत ५ टीएमसी पाणीसाठा आहे. त्यात यंदा सरासरीच्या ९० टक्के पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यामुळे येत्या सोमवारपासून शहरात पाणी कपात करून एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे प्राथमिक नियोजन करण्यात आले आहे. मात्र, पाणी कपातीचे नियोजन करण्यासाठी पालिका प्रशासनाला वेळ देण्यात आला आहे. त्याबाबतचा अंतिम निर्णय आणि पाण्याचे वेळापत्रक येत्या दोन ते तीन दिवसांत जाहीर करण्यात येणार आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठा आणि कमी पावसाचा अंदाज या पाश्वभूमीवर पालिकेत महापौर मंजूषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. उपमहापौर परशुराम वाडेकर, सभागृहांमध्ये गणेश बिडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, विरोधी पक्षनेते नीलेश निकम, काँग्रेसचे गटनेते चंदू कदम, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गटनेते काका चव्हाण, उध्दवसेनेचे गटनेते नितीन गावडे, आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप आदी उपस्थित होते.

# हरित क्रांतीचा नवा अध्याय; पाच लाख वृक्ष लागवडीतून पर्यावरण संवर्धनाला बळ

## पाच लाख वृक्ष लागवडीचा टप्पा केला पार; सुयश चॅरिटेबल ट्रस्टची मोठी कामगिरी

पुणे (दै. संध्या)

सुयश चॅरिटेबल ट्रस्टने पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत पाच लाख वृक्ष लागवडीचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. पुणे, नंदुरबार, वाशिम, गडचिरोली या जिल्ह्यांसह राजस्थान आणि आसाम या राज्यांमध्ये विविध ठिकाणी वृक्ष लागवड करून संस्थेने हरित पर्यावरणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला.



सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या या उपक्रमामध्ये स्थानिक नागरिक, स्वयंसेवक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी तसेच आदिवासी बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भावी पिढ्यांना स्वच्छ, निरोगी व समृद्ध पर्यावरण मिळावे या उद्देशाने ही वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात आली.

वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवडीचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. याची जाणीव ठेवून सुयश चॅरिटेबल ट्रस्ट गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाचे कार्य करत आहे. लागवड केलेल्या रोपांचे संगोपन व संरक्षण यावरही संस्था विशेष भर देत आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास आणि स्मिता घैसास कार्याध्यक्ष शलाका घैसास यांनी या उपक्रमाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, "वृक्ष लागवड ही केवळ मोहीम नसून पर्यावरण रक्षणासाठीची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक आणि प्रभावी होईल."

> "सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून महाराष्ट्रासह राजस्थान आणि आसाममध्ये हरित संदेश पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. पर्यावरण संवर्धनासाठी गेल्या ५० वर्षांपासून ट्रस्ट सातत्याने कार्यरत असून, आज पाच लाखांहून अधिक वृक्ष लागवडीचा टप्पा गाठणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. आगामी काळातही वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची ही चळवळ अधिक व्यापक करण्याचा आमचा संकल्प आहे."
>
> **– शलाका घैसास, कार्याध्यक्ष, सुयश चॅरिटेबल ट्रस्ट**

# महसूल विभागालाच चकवा! बनावट शासकीय आदेशांचे रॅकेट

पुणे (दै. संध्या)

■ भूमाफियांमध्ये खळबळ, महसूल अभिलेखांत फेरफार

महसूल विभागालाच चकवा देत बनावट अकृषिक परवानगी, फाळणीबारा, आकारफोड पत्रके आणि सातबारा नोंदींसाठी खोटे शासकीय आदेश तयार करणाऱ्या टोळीचे पितळ उघडे पडले आहे. पोलिस चौकशीत बनावट आदेश तयार करणाऱ्या टोळीमागील सूत्रधार, दलाल आणि या रॅकेटला संरक्षण देणारे तथाकथित 'बडे मासे' समोर येणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. केसनंद येथील ग्राम महसूल अधिकाऱ्यांना १२ मार्चला अपर तहसीलदारांच्या कथित स्वाक्षरीचे पत्र प्राप्त झाले होते. त्यासोबत अकृषिक परवानगी, फाळणीबारा, आकारफोड आणि सातबारा नोंदींसंदर्भातील विविध आदेश व संचिका जोडण्यात आली होती. संबंधित संचिकेमध्ये बाबासाहेब तुकाराम हरगुडे यांचे नाव अर्जदार म्हणून नमूद करण्यात आले होते. मात्र, कागदपत्रांबाबत संशय आल्याने त्यांची पडताळणी करण्यात आली असता संबंधित पत्र, आदेश तसेच शासकीय अधिकाऱ्यांच्या कथित स्वाक्षऱ्या बनावट असल्याचे निष्पन्न झाले. निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्या नावाने देण्यात आलेली कथित अकृषिक परवानगीही संशयास्पद आढळून आली. केसनंद गाव लोणी काळभोर अपर तहसील कार्यक्षेत्रात असताना हवेली तहसील कार्यालयाशी पत्रव्यवहार दाखविण्यात आला होता. तसेच महसुली अभिलेखांमध्ये फेरफार करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न झाल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे.

# मिळकतकर विभागातील ८ कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी

पुणे (दै. संध्या)

■ एकाला १० हजार दंड

■ कामचुकारपणा आणि अधिकाराबाहेर काम केल्याने उपायुक्त यांच्याकडून कारवाई



पुणे महापालिकेच्या मिळकतकर विभागातील कर्मचाऱ्यांना कामचुकारपणा आणि कामातील बेफिकिरी भोवली आहे. विभागातील ८ कर्मचाऱ्यांच्या विरोधात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून, एका कर्मचाऱ्याला १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. विभागाचे उपायुक्त रवी पवार यांनी याबत माहिती दिली.

ज्या ८ कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी लावण्यात आली आहे, त्यांच्याबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. मिळकतीचे मूल्यमापन न करणे, प्रकरणे जाणूनबुजून प्रलंबित ठेवणे यामुळे नागरिकांचे आणि पर्यायाने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे उपायुक्तांनी शिस्तभंगाची कारवाई केली आहे. चौकशीला सामोरे जाणाऱ्यांमध्ये विभागीय निरीक्षक, पेठ निरीक्षक, अधीक्षक, उप अधीक्षक आणि वरिष्ठ लिपिक यांचा समावेश आहे. मिळकत कर विभागाने ८ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव सादर केला होता. मात्र सामान्य प्रशासन विभागाने सांगितले की, एका कर्मचाऱ्याची चौकशी करण्यासाठी ३२ हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे आपल्या अधिकारात कर्मचाऱ्यांना आर्थिक दंड करा, असे निर्देश देण्यात आले. त्यानुसार आता कर्मचाऱ्यांना आर्थिक दंड करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

औंध क्षेत्रीय कार्यालयात काम करणाऱ्या कनिष्ठ लिपिक महेश वाघमारे यांना १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. वाघमारे यांनी आपल्या अधिकारात नसताना देखील नाम हस्तांतरण प्रकरण केले होते.

विशेष म्हणजे हे प्रकरण शिवणे परिसरातील होते, जे त्यांच्या हद्दीतील नव्हते.

त्यामुळे आर्थिक दंडासोबतच वाघमारे यांचा चार्ज काढून त्यांची बदली करण्यात आली आहे.

उपायुक्त रवी पवार यांनी सांगितले की, आगामी काळातही कामचुकारपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अशा प्रकारची कारवाई करण्यात येईल.

# करिअर निवडताना आवड आणि कौशल्यचा विचार करावा - रवंदळे

पुणे (दै. संध्या)

■ पालकांनी मुलांचे मित्र व्हावे - व्ही. एस. काळभोर

■ खंडोबा देवस्थान ट्रस्ट आणि पीसीईटीच्या वतीने गुणवंतांचा सत्कार



विद्यार्थ्यांनी आपली आवड आणि कौशल्य काय आहे, याचा विचार करून करिअर निवडावे. तसेच भविष्यात या मधून आपल्याला उत्पन्नासाठी रोजगार आणि व्यवसायाच्या किती संधी आहेत याची माहिती घ्यावी. पालकांनी देखील स्वतःची मतं मुलांवर लादू नयेत असे मार्गदर्शन पीसीईटी प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी केले.

आकुर्डी मधील खंडोबा देवस्थान ट्रस्ट आणि पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट यांच्या वतीने श्री खंडोबा सांस्कृतिक भवन येथे इयत्ता १० वी व १२ वी मधील गुणवंत विद्यार्थी, अनाथ आणि मूकबधिर विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे सचिव व श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष व्ही. एस. काळभोर, श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल रामचंद्र काळभोर, उप महापौर शर्मिला बाबर, माजी उप महापौर दिनकरराव दातीर पाटील, कला क्रीडा विभाग सभापती कैलास कुटे, शंकराव पांढरकर, विजय काळभोर, दगडूशेठ हलवाई ट्रस्टचे विजय कोळपकर, विनायक काळभोर, रोहन मुळे आणि खंडोबा देवस्थान ट्रस्ट सदस्य, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.


शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षात दहावी मध्ये वेदांत दाभाडे ९९ टक्के, अद्विका डागलीया हिने ९७ टक्के आणि १२ वी मध्ये गायत्री कुंभार हिला ९६ टक्के गुण मिळाले आहेत. त्यांना सायकल, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले. तसेच इयत्ता १० वी, १२ वी परीक्षेत ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त ३५० विद्यार्थी, पियुष आणि आयुष फुले या दोन अनाथ विद्यार्थ्यांसह, निगडी येथील मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना देखील स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले. पीसीईटी प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी सांगितले की, पालकांनी देखील मुलांची आवड त्यांची मते, त्यांचे कौशल्य याचा विचार करून करिअर निवडी साठी मदत करावी. जे क्षेत्र आवडते त्या क्षेत्रातील सीनियर लोकांना भेटणे, चर्चा करणे, त्यांचे मार्गदर्शन घ्यावे यामुळे करिअर निवडायला मदत होईल. क्षेत्र कोणतेही निवडले तरीही त्यामध्ये कायम अपडेट रहा. प्रत्येक सेमीस्टर मध्ये एक प्रोजेक्ट करा. कॉलेज करतानाच ऑफलाइन किंवा ऑनलाईन इंटर्नशिप करावी असेही डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी सांगितले. प्रास्ताविकात खंडोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल रामचंद्र काळभोर यांनी आजपर्यंच्या ट्रस्टच्या विविध क्षेत्रातील कार्याची माहिती दिली. खंडोबा देवस्थान ट्रस्ट मागच्या ३ वर्षांपासून पीसीइटी सोबत मिळून गुणवंतांचा सत्कार करत आहे. या ट्रस्ट ने मेडिकल कॅम्प, मोफत विवाह सोहळा आयोजित केला आहे. तसेच लवकरच स्पर्धा परीक्षा अभ्यासिका सुरू करण्यात येणार आहे. ट्रस्ट केवळ धार्मिक कार्य करत नसून सामाजिक कार्यात देखील पुढे आहे.

पीसीईटीचे सचिव व्ही. एस. काळभोर यांनी सांगितले की, पालकांनी वयात आलेल्या मुलांचे मित्र व्हावे. आई - वडील व मुलांमध्ये चांगले संबंध आणि संवाद असला पाहिजे. पीसीईटी ही संस्था केजी टू पीजी पर्यंत शिक्षण देण्यात अग्रेसर आहे. सुरुवात ३ हजार विद्यार्थ्यांपासून झाली आता इथे २० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. . महापालिकेच्या योजनांचा शिक्षणासाठी फायदा करून घ्यावा असे पीसीईटी चे सचिव व्ही. एस. काळभोर यांनी सांगितले.

कैलास कुटे यांनी सांगितले कि, खंडोबा देवस्थान ट्रस्ट हे १०० वर्षे परंपरागत ग्रामदैवत आहे. या ट्रस्टने धार्मिक कार्यासोबत शैक्षणिक क्षेत्रात देखील चांगले काम केले आहे. याचा पाया जेष्ठ मंडळींनी रचला आहे. स्वागत, प्रास्ताविक खंडोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल रामचंद्र काळभोर यांनी केले. सूत्र संचालन गणेश काळभोर आणि गणेश दातीर पाटील, आभार संतोष तरटे यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### नेटफ्लिक्स तर्फे लॉकअप च्या सुरुवातीची घोषणा; 27 जूनला उघडणार तुरुंगाचे दरवाजे




मुंबई (दैनिक संध्या) : काही दिवसांच्या अनेक तर्कवितर्कांनंतर तसेच वेगवेगळ्या शहरांतील मुखवटा घातलेल्या "कैद्यांच्या" गूढ दर्शनांनंतर आणि सोशल मीडियावर विविध गोष्टींची रंगतदार चर्चा होत असतांना, नेटफ्लिक्स चर्चा रंगत असताना, नेटफ्लिक्स तर्फे आज अधिकृतपणे एकता कपूर यांच्या बालाजी टेलिफिल्म्सच्या सहकार्याने लॉकअपचा प्रीमियर २७ जून रोजी होणार असल्याची घोषणा करण्यात आली. ही घोषणा लॉकअपसाठी अगदी योग्य वातावरण तयार करत असून यामध्ये भारतातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या काही व्यक्तींना एका छताखाली बंदिस्त केले जाईल. पण मोठा खुलासा होण्यापूर्वी एक असा तमाशा घडेल,याची कुणालाही अपेक्षा नव्हती. शहरांतील लोकांनी अक्षरशः दोनदोनदा वळून पाहावं लागलं. कारण एका प्रचंड होर्डिंगमध्ये तुरुंगाच्या गजांआड बंदिस्त कैदी असल्याचं दिसून आलं. या थक्क करणाऱ्या या चित्रांची क्षणार्धात संपूर्ण शहरात चर्चा सुरू झाली; लोकांची गर्दी, कॅमेरे आणि असंख्य प्रश्न यांना त्या चित्रांनी आकर्षित केलं. हे गूढ कैदी नेमके कोण होते? आणि त्यांना नक्की कोणत्या कारणासाठी कैद करण्यात आलं होतं? आता शेवटी हे रहस्य उलगडले आणि नवीन काऊंटडाऊन सुरु झाले आहे. लॉक अप आता २७ जून पासून नेटफ्लिक्स वर प्रसारित करण्यात येणार आहे. तर मग ही जागा पाहण्यास तयार रहा, कारण खरे नाट्य आता सुरु होणार आहे.

### घोडबंदरच्या शिवसृष्टीतून स्वराज्याचा इतिहास जिवंत होणार : शंभूराज देसाई

मुंबई (दैनिक संध्या) : शिवसृष्टी प्रकल्पातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, विचार आणि स्वराज्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचणार आहे. या प्रकल्पामुळे घोडबंदर किल्ल्याच्या परिसराचा विकास होऊन पर्यटनाला चालना मिळेल, असे प्रतिपादन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले. मंत्रालयातील दालनात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या समवेत ठाण्यातील मिरा-भाईंदर येथे उभारण्यात येणाऱ्या शिवसृष्टी प्रकल्पाच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, पर्यटन विभागाचे उपसचिव विजय पोवार, पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत शिवसृष्टी प्रकल्पाच्या विविध घटकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रकल्पासाठी लागणारा शंभर टक्के निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या सर्व वैधानिक परवानग्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत प्राप्त करून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास उपलब्ध करून देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. प्रकल्पाची कामे नियोजित कालावधीत आणि उच्च दर्जाने पूर्ण करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देसाई यांनी दिल्या.

### मॅरिएट इंटरनॅशनलचा एमएस ग्रुप बरोबर करार




पुणे (दैनिक संध्या) :मॅरिएट इंटरनॅशनल ने एमएस ग्रुप बरोबर करार केला असून याअंतर्गत नेपाळमधील काठमांडू येथे पहिला जेडब्ल्यू मॅरिएट ब्रँड सादर करण्यात येणार आहे. 2031 पर्यंत हे हॉटेल सुरू होण्याची अपेक्षा आहे.

### हेन्केलच्या कुरकुंभ प्रकल्पाने गाठला कार्बन-तटस्थतेचा टप्पा; कामकाजाला वेग



पुणे (दैनिक संध्या) : हेन्केलने आपल्या चिकटवणी तंत्रज्ञान व्यवसायांतर्गत शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत भारतातील कुरकुंभ आणि तुर्कीतील गेबकीम येथील उत्पादन केंद्रांमध्ये कार्बन-तटस्थ उत्पादन साध्य केले आहे. या दोन्ही केंद्रांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष ऊर्जा वापरातून होणारे हरितगृह वायू उत्सर्जन पूर्णपणे थांबवले असून, २०३० पर्यंत कार्बनमुक्त कामकाजाचे उद्दिष्ट गाठण्याच्या दिशेने कंपनीने मोठी झेप घेतली आहे.कुरकुंभ येथील प्रकल्पात इंधन तेलावर चालणाऱ्या उष्णता यंत्रणांच्या जागी उच्च कार्यक्षमतेच्या विद्युत यंत्रणा बसविण्यात आल्या. त्यामुळे जीवाश्म इंधनाचा वापर पूर्णपणे बंद झाला. यासाठी ऊर्जा पायाभूत सुविधांमध्ये व्यापक सुधारणा, उष्णता व्यवस्थापनाचे अनुकूलन, उच्च कार्यक्षमतेच्या उष्णता विनिमय यंत्रणांची उभारणी आणि विद्युत क्षमतेत वाढ करण्यात आली. शंभर टक्के अक्षय ऊर्जेच्या वापरामुळे या प्रकल्पातील वार्षिक सुमारे ११ हजार ३०० टन कार्बन डायऑक्साइड समतुल्य उत्सर्जन बंद करण्यात यश आले आहे. त्यामुळे कुरकुंभ प्रकल्पाचा कार्बनमुक्तीचा प्रवास अधिक वेगाने पुढे सरकला आहे. तुर्कीतील गेबकीम प्रकल्पात नैसर्गिक वायूवर चालणाऱ्या वाफनिर्मिती यंत्रणांच्या जागी उच्च कार्यक्षमतेच्या विद्युत यंत्रणा बसविण्यात आल्या. त्यामुळे प्रत्यक्ष जीवाश्म इंधनाचा वापर थांबला असून, वार्षिक सुमारे ९५६ टन कार्बन डायऑक्साइड समतुल्य उत्सर्जनात घट झाली आहे.

## सासवडला नवोदित लेखिका पावणी जगताप यांच्या

# “यूं हसी वादीयां” पुस्तकाचे प्रकाशन

सासवड (दै. संध्या)



भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरची केवळ पर्यटन किंवा मनाला भुरळ घालणारा निसर्गसौंदर्य इतकीच सीमित कल्पना न ठेवता तेथील लोकांचे जीवनमान, भौगोलिक स्थिती, संरक्षण पद्धती, विचारधारा याचे बारकाईने निरीक्षण करून ते शब्दबद्ध केलेल्या "यूं हसी वादीयां" या सासवड येथील युवा लेखिका पावणी दिनेश जगताप यांच्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले.

सासवडच्या शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या स्व चंदूकाका जगताप सभागृहात झालेल्या या सोहळ्यास मानद उपचारक डॉ वैजयंती नगरकर अध्यक्ष म्हणून तर शिवाजी स्कूलच्या प्राचार्या रेणुकासिंह मर्चन्ट, प्रकाशक अरुण चिंचकर व पुरंदर नागरी पतसंस्थेचे व्यवस्थापक अनिल उरवणे प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते.

दिप प्रज्वलन व सुवर्णा होले यांच्या ए कौन चित्रकार है या गीताने कार्यक्रमाची सुरवात झाली. गौरी प्रभुणे, हृदया जगताप व अनिल कदम यांनी पुस्तकातील काही भागाचे अभिवाचन केले. डॉ दिनेश जगताप यांनी प्रास्तविक केले तर शिल्पा हेंद्रे व सुनील हेंद्रे यांनी सर्वांचे स्वागत केले. याच कार्यक्रमात पावणी जगताप व तिच्या परिवाराकडून वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या सतीश पाटील, राजेंद्र गिरमे व अमोल बागडे यांचा मानपत्र, शाल श्रीफळ, स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला.संजय काटकर यांनी पाहुण्यांचा परिचय तर मोहन बागडे यांनी सन्मानपत्राचे वाचन केले.सचिन घोलप सर यांनी सुंदर सूत्रसंचालन केले व अनिल कदम यांनी आभार मानले.

लेखिका पावणी जगताप, प्रकाशक अरुण चिंचकर,प्रा रेणुकासिंह मर्चन्ट, डॉ वैजयंती नगरकर यांनी यावेळी मनोगते मांडली. काश्मीरची आपल्या मनातील इमेज थोडी बदलण्याचा हा प्रयत्न आहे असे पावनी हिने सांगत जगणं आणि जिवंत असणं यात सूक्ष्म काही आहे ते वेचता आले पाहिजे असा विचार मांडला. माझ्या पुस्तकाने कोणाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेत अगदी कमी वयात पावनी ने उत्तुंग भरारी घेतल्याचे रेणुकासिंह यांनी सांगितले. उत्तम मानसोपचार तज्ज्ञ असणाऱ्या डॉ नगरकर यांनी मुले व पालक यांच्या नात्याचा सुंदर विचार व्यक्त केला. पालकांनी मुलांना पंख द्यावेत भरारी त्यांना घेऊ द्या असा सल्ला त्यांनी देत पावनी हिच्या कर्तृत्वाचे अभिनंदन केले. जीवन आनंदी आहे तो आघात समजू नका असेही त्यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले.

संतोष जगताप, स्नेहल देशपांडे, वामन जगताप,तानाजी सातव,बाळासाहेब भिंताडे,वर्षा साबळे,रेश्मा कामठे, आबा बागडे, सुनील मेमाणे, संतोष शेंडकर, प्रा सुभाष तळेकर, डॉ प्रज्ञा देशमुख, सोमनाथ भोंगळे, मेनका जगताप, स्वाती थिटे अभिजित धुमाळ,रोहित खामकर, अश्विनी मोरे, रणजित गायकवाड, संजय प्रभुणे यांसह अनेक साहित्यप्रेमी यावेळी उपस्थित होते.

## पुणे, कोल्हापुरात मेडिकल फर्मवर छापा, २५ लाखांची औषधं जप्त

नवी दिल्ली (दै. संध्या) :

बेकायदेशीर औषध व्यवसायावर अन्न व औषध प्रशासन विभागाने मोठी कारवाई केली आहे. कोल्हापूर आणि पुण्यातील कारवाईत तब्बल 24.87 लाख रुपयांचा औषधसाठा जप्त करण्यात आला आहे. कोल्हापूरमधील मेडिकल फर्मवर छापा, 13.76 लाखांचे ॲलोपॅथिक औषध जप्त केले आहे. आवश्यक परवाने व कागदपत्रांअभावी औषधसाठ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. पुण्यात नामांकित औषध कंपनीच्या गोदामातून 11.11 लाखांची Schedule-H औषधे जप्त करण्यात आली आहेत. प्रिस्क्रिप्शन औषधांच्या जाहिरातीबाबत नियमभंग आढळल्याने कारवाई केली आहे. जप्त औषधांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. संबंधित प्रकरणांमध्ये पुढील कायदेशीर कार्यवाही सुरु आहे. नागरिकांना केवळ अधिकृत व परवानाधारक विक्रेत्यांकडूनच औषधे खरेदी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संशयास्पद औषध विक्री किंवा बेकायदेशीर साठ्याची माहिती प्रशासनाला देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणा असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाच्या वतीनं देण्यात आली आहे. साईबाबांच्या शिर्डीत भाविकांच्या आरोग्याशी अक्षरशः खेळ सुरू आहे.

मंदिर परिसरात असणाऱ्या शेकडो प्रसादाच्या दुकानांवर भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांची विक्री सुरू असल्याचं समोर आलं आहे. दररोज हजारो तर वर्षाकाठी करोडो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येतात.

अनेक भाविक साई मंदिर परिसरात असणाऱ्या खाजगी दुकानदारांकडून प्रसाद विकत घेतात. मात्र या दुकानांमध्ये विकल्या जाणाऱ्या पेढा प्रसादावर पॅकेजिंग आणि एक्सपायरी डेट, तसेच हा पेढा नेमका कुठे आणि कोण बनवतो याबाबत उल्लेख नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

## हेलिऑनने सुमारे ₹2000 कोटींची गुंतवणूक जाहीर केली

नवी दिल्ली (दै. संध्या) :




बेहतर एव्हरीडे हेल्थवर लक्ष केंद्रित करणाऱ्या हेलिऑन या ग्राहक कंपनीने आज भारतात पहिले उत्पादन केंद्र उभारण्याची योजना जाहीर केली. मध्य प्रदेशातील पिथमपूर येथे अत्याधुनिक ग्रीनफिल्ड साइट उभारली जाणार असून ती स्मार्ट इंडस्ट्रियल पार्कमधील 40 एकरांहून अधिक क्षेत्रावर पसरलेली असेल. ही सुविधा भारताच्या ग्राहक आरोग्य क्षेत्रातील महत्त्वपूर्ण गुंतवणूक ठरणार आहे आणि देशाला धोरणात्मक वाढीच्या बाजारपेठेच्या रूपात बळकट करण्यासाठी हेलिऑनची दीर्घकालीन बांधिलकी अधोरेखित करणार आहे. ही घोषणा खालील मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली डॉ. मोहन यादव, मुख्यमंत्री, मध्य प्रदेश; ब्रायन मॅकनॅमारा, मुख्य कार्यकारी अधिकारी, हेलिऑन; केदार लेले, सीईओ इंडिया आणि अध्यक्ष, हेलिऑन आयएससी; आणि नम्रता पटेल, मुख्य पुरवठा साखळी अधिकारी, हेलिऑन. नवीन उत्पादन केंद्र भारतातील हेलिऑनच्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हे केंद्र पुरवठा साखळीची स्थिरता मजबूत करेल, स्थानिक मूल्यवर्धनाला चालना देईल आणि आशियातील विस्तृत बाजारपेठांसाठी निर्यात सक्षम करेल. भारत सरकारच्या ‘मेक इन इंडिया’ दृष्टिकोनाशी सुसंगत ही गुंतवणूक पुढील दशकात व्यापक आर्थिक मूल्य निर्माण करेल. निर्यात स्पर्धात्मकता वाढवेल, राज्य महसुलात योगदान देईल आणि भारताला जागतिक पुरवठा साखळ्यांमध्ये अधिक समाविष्ट करेल. या सुविधेमुळे सुमारे 500 थेट रोजगार निर्माण होतील तसेच अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. कौशल्य विकास, स्थानिक प्रतिभा आणि पुरवठादार नेटवर्कचा लाभ घेण्यावर विशेष भर दिला जाईल. हेलिऑनचे उद्दिष्ट विविध आणि समावेशक कार्यबल उभारणे आहे, ज्यामध्ये या ठिकाणी 30% महिला कर्मचारी ठेवण्याची महत्त्वाकांक्षा आहे. श्री मोहन यादव, मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री, यांनी या प्रसंगी सांगितले, “मध्यप्रदेश सातत्याने जागतिक गुंतवणुकीसाठी पसंतीचे ठिकाण म्हणून उदयास येत आहे. यामागे राज्याची मजबूत पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ आणि उद्योग-स्नेही धोरणे आहेत. हॅलिऑनने भारतात आपली पहिली उत्पादन सुविधा पिथमपूर येथे उभारण्याचा घेतलेला निर्णय हा राज्याच्या वाढीच्या क्षमतेवर आणि व्यावसायिक वातावरणावर अग्रगण्य जागतिक कंपन्यांचा वाढता विश्वास दाखवतो. ही ₹2,000 कोटींची गुंतवणूक मध्यप्रदेशाला एक महत्त्वाचे उत्पादन आणि निर्यात केंद्र म्हणून अधिक बळकट करेल, तसेच आर्थिक विकास आणि औद्योगिक प्रगतीस हातभार लावेल. मध्यप्रदेश सरकार हॅलिऑनच्या राज्यातील वाढीच्या प्रवासात सातत्याने साथ देण्यास कटिबद्ध आहे आणि शाश्वत औद्योगिक प्रगतीसाठी सक्षम वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे.”

गुंतवणुकीची घोषणा करताना हेलिऑनचे मुख्य कार्यकारी अधिकारी ब्रायन मॅकनॅमारा म्हणाले: “भारत हेलिऑनसाठी एक महत्त्वाचा धोरणात्मक बाजार आहे आणि आमच्या दीर्घकालीन वाढीचा प्रमुख चालक आहे. ही गुंतवणूक आमच्या स्थानिक उत्पादन क्षमतेला बळकट करते आणि जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या ग्राहक आरोग्य बाजारपेठेत आमची पोहोच वाढवते. आमच्या विश्वासार्ह ब्रँड्सचा प्रवेश वाढवून आणि स्थानिक स्तरावर आमच्या क्षमतांचा विकास करून आम्ही आगामी महत्त्वपूर्ण संधींचा लाभ घेण्यासाठी सज्ज आहोत.”

## पुणे महापालिकेचा कनिष्ठ अभियंता निकाल जाहीर

पुणे (दै. संध्या) :

■ QR कोडद्वारे पाहा गुण

■ १६९ पदांसाठी ४१ हजार अर्ज, फक्त २० हजार ७३५ उमेदवार हजर

पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग-३ च्या १६९ पदांच्या भरती परीक्षेचा निकाल आज, ९ जून २०२६ रोजी जाहीर करण्यात आला आहे. उमेदवारांना आता आपले गुण आणि निकाल सुरक्षित QR कोड लिंकद्वारे महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर पाहता येणार आहेत.

पुणे महापालिकेच्या माहिती व जनसंपर्क कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या प्रेस नोटनुसार, हा निकाल https://www.pmc.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. निकालपत्रावर सुरक्षेसाठी QR कोड लिंक समाविष्ट करण्यात आली आहे, जेणेकरून उमेदवारांना तात्काळ आणि अधिकृत पद्धतीने निकाल पडताळता येईल.

कशी होती भरती प्रक्रिया?

१ ऑक्टोबर २०२५ रोजी १६९ पदांसाठी अर्ज मागवण्यात आले होते. एकूण ४१ हजार २७२ उमेदवारांनी अर्ज सादर केले होते. यापैकी फक्त २० हजार ७३५ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. उर्वरित जवळपास ५० टक्के उमेदवार गैरहजर राहिले.

ही परीक्षा IBPS या नामांकित संस्थेमार्फत २२, २३ आणि २९ एप्रिल २०२६ रोजी एकूण ७ सत्रांमध्ये ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. पुणे, मुंबई, नागपूर, अमरावती, नांदेड, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर या सात शहरांतील केंद्रांवर परीक्षा पार पडली.

महापालिकेने स्पष्ट केले आहे की, निकालानंतर १:३ या प्रमाणात पात्र उमेदवारांची यादी कागदपत्र पडताळणीसाठी स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहे.

संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक आणि गुणवत्तेवर आधारित असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. कोणत्याही मध्यस्थ, दलाल किंवा तोतया व्यक्तीच्या आमिषाला बळी न पडण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. खोटी माहिती किंवा पैसे मागितल्यास तात्काळ प्रशासनाला कळवावे, असे उप आयुक्त किशोरी शिंदे यांनी म्हटले आहे.

## मोठ्या खासगी बँकेचा ग्राहकांना दणका

नवी दिल्ली (दै. संध्या) : देशातील सर्वात मोठ्या खासगी बँक असलेल्या एचडीएफसीने आपल्या कर्जाचे व्याजदर वाढवले आहेत. परिणामी, ग्राहकांना आता घर, कार किंवा वैयक्तिक कर्जाच्या ईएमआयसाठी पूर्वीपेक्षा जास्त पैसे द्यावे लागतील. बँकेने आपला मार्जिनल कॉस्ट ऑफ फंड्स-बेस्ड लेंडिंग रेट (MCLR) 5 ते 10 बेसिस पॉइंट्सने वाढवला आहे. हे नवीन दर उद्या, 8 जून 2026 पासून लागू झाले आहेत. या निर्णयाचा परिणाम अशा ग्राहकांवर होईल ज्यांची घर, कार किंवा वैयक्तिक कर्जे एमसीएलआरशी जोडलेली आहेत. या ग्राहकांना एकतर ईएमआयमध्ये वाढ किंवा कर्ज परतफेडीच्या कालावधीत वाढ अनुभवावी लागू शकते.

## डॉ. माधवी खोडे-चवरे यांच्यासह ४ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

नवी दिल्ली (दै. संध्या) :

राज्य शासनाने प्रशासकीय पातळीवर एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला असून, 4 वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या (IAS Officers) बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यामध्ये नागपूर, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यामध्ये नागपूर विभागाच्या अतिरिक्त विभागीय आयुक्त डॉ. माधवी खोडे चवरे यांची बदली मुंबईमध्ये करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत मंगळवारी हा अधिकृत बदली आदेश जारी करण्यात आला आहे. बदल्या झालेल्या अधिकाऱ्यांची नावे आणि त्यांच्या नवीन नियुक्तीचे ठिकाण खालीलप्रमाणे आहे:

1. डॉ. माधवी खोडे-चवरे (IAS:RR:2007) पूर्वीचे पद : अतिरिक्त विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर. नवीन पद: सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. 2. सुनील महिंद्रकर (IAS:SCS:2015) नवीन नियुक्ती : अतिरिक्त मुद्रांक नियंत्रक (Additional Controller of Stamp), मुंबई. 3. अनिता मेश्राम (IAS:SCS:2015) पूर्वीचे पद : मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), जिल्हा परिषद, अकोला. नवीन पद : आयुक्त, मनरेगा (MGNREGS), नागपूर.

## एएम/एनएस इंडिया आणि आयआयटी रुडकी यांच्यात करार

### उत्पादन व पोलाद क्षेत्रातील संशोधनाला चालना




सुरत (दै. संध्या) :

एएम/एनएस इंडिया आणि Indian Institute of Technology Roorkee (आयआयटी रुडकी) यांच्यात शिक्षण, संशोधन, नवतंत्रज्ञान आणि उद्योग-संवाद क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे उत्पादन आणि पोलाद क्षेत्रातील कौशल्यविकास, संशोधन आणि औद्योगिक स्पर्धात्मकता वाढण्यास मदत होणार आहे.

उद्योग क्षेत्रातील व्यावहारिक अनुभव आणि आयआयटी रुडकीचे शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील योगदान यांचा संगम या करारातून साधला जाणार आहे. उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील दरी कमी करून भविष्यातील कुशल मनुष्यबळ तयार करणे हा या कराराचा प्रमुख उद्देश आहे.

या कराराअंतर्गत दोन्ही संस्था संयुक्तपणे शैक्षणिक कार्यक्रम, वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण, व्यावसायिक विकास अभ्यासक्रम आणि मनुष्यबळ विकास उपक्रम राबविणार आहेत. तसेच उद्योगाभिमुख सल्लागार सेवा, तांत्रिक मूल्यमापन, समस्या निवारण, संयुक्त संशोधन, बौद्धिक संपदा निर्मिती आणि तंत्रज्ञान हस्तांतरण यांसारख्या उपक्रमांवरही भर दिला जाणार आहे.

एएम/एनएस इंडिया या भागीदारीसाठी ‘नामटेक’ या आपल्या शैक्षणिक उपक्रमाचा वापर करणार आहे. उद्योगांच्या गरजांनुसार तयार केलेले अभ्यासक्रम, अनुभवाधारित शिक्षण आणि प्रत्यक्ष समस्यांवर आधारित संशोधन यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगस्नेही कौशल्ये मिळणार आहेत.

यावेळी एएम/एनएस इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी Dilip Oommen म्हणाले, “भारताच्या औद्योगिक परिवर्तनासाठी उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील सखोल सहकार्य आवश्यक आहे. या भागीदारीच्या माध्यमातून भविष्यासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करणे, उपयोजित संशोधनाला चालना देणे आणि उत्पादन व पोलाद क्षेत्राची स्पर्धात्मकता वाढविणे हे आमचे ध्येय आहे.”

आयआयटी रुडकीचे संचालक K. K. Pant म्हणाले, “शैक्षणिक संशोधनाचे उद्योगाभिमुख परिणामांमध्ये रूपांतर करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे.

## इंदापूर तालुक्यात पाणी पोहोचविण्याबाबत तात्काळ आदेश

भिगवण (दै. संध्या) :



इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना खडकवासला कालव्याचे पाणी पूर्ण दाबाने व नियमित स्वरूपात मिळावे, यासाठी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते प्रदीप गारटकर यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात इंदापूर तालुक्यातील शेती क्षेत्र, पाण्याची वाढती गरज तसेच कालव्याच्या शेवटच्या टप्प्यात पाणी पोहोचताना येणाऱ्या अडचणी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून पाणी वितरण व्यवस्था अधिक प्रभावी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या निवेदनाची दखल घेत जलसंपदा मंत्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. खडकवासला कालव्याचे पाणी कोणत्याही अडथळ्याशिवाय व पूर्ण क्षमतेने इंदापूर तालुक्यातील शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचावे, यासाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता असून, पिकांच्या सिंचनासाठी आवश्यक पाणी वेळेवर उपलब्ध होणार आहे.


## जाहीर नोटीस


तमाम लोकांस विशेषतः गाव गोळेगाव, ता. जुन्नर, जि. पुणे यांसी गाव विभाजनानंतरचे मौजे अष्टविनायक लेण्याद्री, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व आसपासचे सर्व लोकांस आमचे आशिल यांनी सांगितलेवरुन जाहीर नोटीस देण्यात येते की,

गाव गोळेगाव, ता. जुन्नर, जि. पुणे यांसी गाव विभाजनानंतरचे मौजे अष्टविनायक लेण्याद्री, ता. जुन्नर, जि. पुणे येथील खाते क्र. २२१ वरील जमीन ग.नं. जुना २१/१/क यांसी नवीन ६६/१/३ क्षेत्र ०० हे ६७ आर + पो.ख. ०० हे ०८ आर, एकूण ०० हे ७५ आर, आकार ०० रु. ८४ पैसे ही मिळकत श्री. सुनिल दत्तात्रय सरजिने, सौ. मंगल सुनिल सरजिने व श्री. शुभम सुनिल सरजिने यांचे मालकी ताबेवहिवाटीची मिळकत आहे. सदरहू मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार आमचे आशिलांनी श्री. सुनिल दत्तात्रय सरजिने, सौ. मंगल सुनिल सरजिने व श्री. शुभम सुनिल सरजिने करण्याचे ठरविलेले आहे. तसेच सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असलेबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षीस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी-बांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क, हद्दी संदर्भात वाद, चतुः सिमांबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंदु कायद्याप्रमाणे अथवा प्रचलीत प्रथेप्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरुध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीवपुर्वक सोडून दिलेली आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी. सही/-

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. ०९/०६/२०२६

श्री. विश्वजीत गोपाळ वर्पे,
ॲडव्होकेट
मु. पो. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे.
ऑफिस - हिन्दू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व्यापारी संकुल, दुसरा मजला, गाळा नं. १९, धान्य बाजार पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०२, मोबा. ९७३०८२८७२१.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चिखली-कुदळवाडीत पहाटे अतिक्रमण कारवाई; पाच धार्मिक स्थळे पाडल्याचा आरोप

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेने मंगळवारी पहाटे चिखली-कुदळवाडी परिसरात अतिक्रमणविरोधी मोहीम राबवत काही अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली. मात्र, या कारवाई दरम्यान एकाच समाजाशी संबंधित पाच धार्मिक स्थळे पाडण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कारवाईपूर्वी स्थानिक रहिवाशांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांना निवेदन सादर करून अतिक्रमण हटविताना पारदर्शकता राखावी तसेच कोणत्याही एका समाजाला लक्ष्य करण्यात येऊ नये, अशी मागणी केली होती. तथापि, निवेदन दिल्यानंतर अवघ्या काही तासांत पहाटेच्या सुमारास कारवाई करण्यात आल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, परिसरातील सर्व अतिक्रमणांवर समान निकषांनुसार कारवाई होणे अपेक्षित असताना निवडक बांधकामांवरच हातोडा चालविण्यात आला. त्यामुळे संबंधित कारवाईबाबत निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात येत आहे. याप्रकरणी नागरिकांनी पुढील कायदेशीर पर्यायांचा अवलंब करण्याचा इशारा दिला असून, सर्व अतिक्रमणांवर एकसमान धोरण राबविण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. दरम्यान, विशिष्ट समाजाला लक्ष्य केल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत असला तरी या आरोपांबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या कारवाई मागील नेमकी कारणे आणि प्रशासनाची बाजू स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

### 70 हजारांची लाच स्वीकारताना तलाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात


पिंपरी (दैनिक संध्या) : वारसनोंद करून देण्यासाठी ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना चऱ्होली बुद्रुक येथील तलाठी आणि त्याच्या वतीने रक्कम स्वीकारणाऱ्या एका खासगी व्यक्तीला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सोमवारी (दि.८) रंगेहात पकडले. ही कारवाई चऱ्होली बुद्रुक ग्राम महसूल कार्यालयात करण्यात आली. ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये चऱ्होली बुद्रुक (हवेली) येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) सुनील भिकाजी सातोसे (४४) आणि खासगी व्यक्ती नेमाजी माधवराव भोकरे (४०) यांचा समावेश आहे. या दोघांविरुद्ध दिघी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांच्या आजोबांच्या नावे चऱ्होली बुद्रुक येथे वडिलोपार्जित शेती असून, त्यांच्या निधनानंतर संबंधित जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर तक्रारदारांचे वडील व काका यांची वारसनोंद करण्यासाठी डिसेंबर २०२५ मध्ये अर्ज करण्यात आला होता. मात्र, अनेकदा पाठपुरावा करूनही वारसनोंदीची कार्यवाही करण्यात आली नव्हती.

### जमावाकडून दगडफेकही

पिंपरी (दैनिक संध्या) : चिखली, कुदळवाडीत महापालिकेने अनधिकृत बांधकामांविरोधात पुन्हा एकदा मोठी कारवाई करत मशीद, मंदिरांसह एकूण ११ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केली. मध्यरात्रीच्या सुमारास मोठ्या पोलिस बंदोबस्तात ही मोहीम राबविण्यात आली. कारवाई दरम्यान परिसरात जमावाकडून दगडफेक झाल्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाल्याची माहिती मिळत आहे. स्थानिक नागरिक आणि पोलिसांमध्ये शाब्दिक वाद झाल्याची तसेच काही ठिकाणी दगडफेक झाली आहे. या घटनेचे काही व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दगडफेकीत काही पोलीस कर्मचारी जखमी झाल्याचे बोलले जात असले, तरी प्रशासनाकडून याबाबत अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. दरम्यान, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी कोणताही मोठा संघर्ष झाल्याचे वृत्त फेटाळले आहे. कारवाई दरम्यान काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत संपूर्ण मोहीम शांततेत पूर्ण केल्याचा दावा त्यांनी केला. महापौर लांडगे यांनी सांगितले की, शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधातील मोहीम पुढेही सुरू राहणार असून, विविध धार्मिक स्थळांसह इतर बेकायदा बांधकामांवरही नियमानुसार कारवाई केली जाईल. तसेच अतिक्रमण, अवैध धंदे आणि नियमबाह्य व्यवसायांविरोधात महापालिका कठोर भूमिका घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याआधीही महापालिकेने शहरातील अवैध दारूअड्ड्यांवर कारवाई करत मोठे अतिक्रमण हटविले होते. अशा सर्व बेकायदा प्रकारांवर भविष्यातही हातोडा चालविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने संकेत दिले आहेत.

# जनगणना २०२७चा पहिला टप्पा अंतिम टप्प्यात

## घर सूचीकरण प्रक्रिया पूर्णत्वाकडे : घर सूचीकरण व घर गणनेसाठी नागरिकांच्या सक्रिय सहभागावर प्रशासनाचा भर




पिंपरी (दै. संध्या)

जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या घर सूचीकरण व घर गणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अवघे सहा दिवस शिल्लक राहिले असून, नागरिकांनी जनगणना कर्मचाऱ्यांना अचूक व संपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने केले आहे. देशातील सर्वात मोठा लोकसहभागाचा उपक्रम असलेल्या जनगणनेद्वारे लोकसंख्या, निवास व्यवस्था, शिक्षण, आरोग्य तसेच सामाजिक व आर्थिक स्थितीविषयीची माहिती संकलित केली जाते. याच माहितीच्या आधारे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, पायाभूत सुविधा आणि विकास आराखड्यांचे नियोजन केले जाते. त्यामुळे प्रत्येक घराची अचूक नोंद होणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, जनगणना ही देशाच्या विकास प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची बाब आहे. नागरिकांनी जनगणना कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती प्रामाणिकपणे व अचूकपणे उपलब्ध करून द्यावी. जनगणनेतून प्राप्त होणारी माहिती भविष्यातील विकास धोरणे आणि सार्वजनिक सुविधांच्या नियोजनासाठी उपयुक्त ठरते. त्यामुळे उर्वरित कालावधीत प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने सहभाग नोंदवावा.

पिंपरी चिंचवड महापालिका उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार म्हणाले, घर सूचीकरण व घर गणनेच्या पहिल्या टप्प्याची मुदत संपण्यास अवघे सहा दिवस उरले आहेत. ज्या नागरिकांची माहिती अद्याप नोंदविण्यात आलेली नाही, त्यांनी जनगणना कर्मचाऱ्यांशी सहकार्य करून आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी. जनगणनेचे यश हे नागरिकांच्या सक्रिय सहभागावर अवलंबून आहे.

जनगणना कर्मचाऱ्यांच्या भेटीदरम्यान नागरिकांनी आवश्यक माहिती तत्परतेने उपलब्ध करून देत या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

"आपली जनगणना, आपला विकास" या संकल्पनेतून प्रत्येक नागरिकाचा सहभाग देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे महापालिकेने नमूद केले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पदाच्या तपपूर्ती निमित्त नरसिंह महायज्ञ



पिंपरी (दै. संध्या)

भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारला १२ वर्षे पूर्ण होत आहेत. या तपपूर्ती निमित्त आणि नरेंद्र मोदी यांच्या तपसाधनेला व विकसित भारताच्या संकल्पाला आध्यात्मिक बळ मिळावे या उद्देशाने राज्यसभेचे माजी खासदार अमर साबळे आणि भारतीय जनता पक्षाच्या वतीने "नरसिंह महायज्ञ" आयोजित करण्यात आला आहे. आज मंगळवार, (दि.९ जून) दुपारी ३:३० वाजता, श्रीकृष्ण मंदिर, इस्कॉन, कात्रज, पुणे (इस्कॉन एनव्हीसीसी अण्णामृत) येथे या धार्मिक आणि सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या भव्य महायज्ञ कार्यक्रमास उपस्थित राहून या महान राष्ट्र कार्यात आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन संयोजक, माजी खासदार अमर साबळे यांनी केले आहे. पिंपरी येथे सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत यावेळी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी नगरसेवक माऊली थोरात, ॲड. मोरेश्वर शेडगे, ज्येष्ठ नेते विजय शिनकर आदी उपस्थित होते.

## रक्तदान शिबिराला प्रचंड प्रतिसाद; शेकडो नागरिकांनी केले रक्तदान

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या ४० व्या स्मृतिदिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. तसेच आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून ११० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

यावेळी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत स्मृतिदिन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमात ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. एस. बी. चांडक यांना 'पिंपरी-चिंचवड समाजभूषण पुरस्कार' प्रदान करून त्यांच्या सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला आमदार अमित गोरखे, महापौर रवि लांडगे, उपमहापौर शैलजा बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे, नगरसेविका स्वाती (माई) काटे, शिवसेना (उबाठा) शहराध्यक्ष चेतन पवार, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

तसेच माजी नगरसेवक अरुणभाऊ बोऱ्हाडे, फजलभाई शेख, दत्तात्रय वाघेरे, हनुमंत नेवाळे, नरहरी कापसे, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब (आप्पा) वाघेरे, नानिक पंजाबी, गणेश ढाकणे, उद्योजक गणेश कुदळे, उषाताई वाघेरे, अनिता वाळुंजकर, शोभा मुंढे, कन्या विद्यालयाच्या प्राचार्य परदेशी मॅडम, दत्तात्रय मासुळकर, डॉ. पांडुरंग भोसले, अजय जयसिंग कापरे, पवना सहकारी बँकेचे संचालक शिवाजी वाघेरे, बिपीनशेठ नाणेकर, उद्योजक विजय काटे, दिलीप देवकर, यशवंत साखरे, काळूराम लांडगे, हनुमंत उर्फ बाळासाहेब वाघेरे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या सामाजिक, राजकीय आणि जनसेवेतील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या कार्याचा आदर्श पुढील पिढ्यांनी घ्यावा, असे मत व्यक्त करत त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच अधिकाऱ्यांसमवेत घेतली बैठक

पिंपरी (दै. संध्या)

■ महापालिकेच्या विविध कामकाजाचा घेतला सविस्तर आढावा



विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी आज पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी बैठक घेऊन पिंपरीतील विकासकामांची सद्यस्थिती, प्रशासकीय कामकाज तसेच प्रलंबित प्रकल्पांची प्रगती याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधला. महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी बैठकीदरम्यान त्यांचे स्वागत केले. शहरातील सुरू असलेल्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांची माहिती तसेच विविध विकासकामांची अंमलबजावणीबाबत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी माहिती दिली.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, नगररचना विभागाचे उपसंचालक किशोर गोखले, उप आयुक्त अण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप, कार्यकारी अभियंता विजय भोजणे, तसेच महानगरपालिकेतील विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान अण्णा बनसोडे यांनी पिंपरी विधानसभा मतदारसंघासह शहरातील विविध भागांमध्ये सुरू असलेल्या रस्ते विकास, पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, नगररचना, सार्वजनिक सुविधा आणि नागरी पायाभूत सुविधांशी संबंधित कामकाजाचा आढावा घेतला. प्रलंबित कामांना गती देणे, नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करणे तसेच विकासकामांमध्ये पारदर्शकता राखण्याबाबत त्यांनी सूचना दिल्या.

याशिवाय, महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची सद्यस्थिती, अडचणी व भविष्यातील नियोजन यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांनी संबंधित विषयांवर माहिती देत आवश्यक सुधारणा व उपाययोजनांबाबत विचार मांडले.

## पुनावळेतील 'ती' जागा खाजगी संस्थेला भाडेतत्त्वावर देण्यास विरोध..!

पिंपरी (दै. संध्या)



■ महापालिकेने स्वतःची आधुनिक सीबीएसई माध्यमिक शाळा सुरू करावी; नगरसेविका रेश्मा भुजबळ यांची मागणी

पुनावळे परिसरातील माध्यमिक शाळेसाठी राखीव असलेली महापालिकेची जागा खासगी संस्थेला ३० वर्षांसाठी भाडेतत्त्वावर देण्याच्या प्रस्तावाला विरोध करत नगरसेविका रेश्मा चेतन भुजबळ यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले आहे. सदर जागेवर खासगी संस्था उभारण्याऐवजी महापालिकेने स्वतःची आधुनिक सीबीएसई माध्यमिक शाळा सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. निवेदनानुसार, पुनावळे येथील सर्व्हे क्रमांक ३८/४४, आरक्षण क्रमांक ४/५७ ही जागा माध्यमिक शाळेसाठी राखीव आहे. या जागेसाठी एका खासगी संस्थेकडून ३० वर्षांच्या भाडेकरारासाठी अर्ज करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, पुनावळे आणि परिसर हा वेगाने विकसित होणारा निवासी भाग असून उच्च दर्जाच्या शिक्षण सुविधांची नागरिकांकडून मोठी मागणी आहे. रेश्मा भुजबळ यांनी निवेदनात म्हटले आहे की, पुनावळे परिसरात सध्या उपलब्ध असलेल्या प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येमुळे अपुऱ्या पडत आहेत. तसेच परिसरात महापालिकेची माध्यमिक शाळा नसल्याने विद्यार्थ्यांना अन्य भागात जावे लागते. त्यामुळे नागरिकांची दीर्घकाळापासून सीबीएसई अभ्यासक्रमाच्या महापालिका शाळेची मागणी आहे. नागरिकांच्या अपेक्षा लक्षात घेता, राखीव जागा खासगी संस्थेला देण्याऐवजी त्या ठिकाणी महापालिकेने आधुनिक, सुसज्ज आणि दर्जेदार माध्यमिक शाळा सुरू करावी.

## राज्यस्तरीय स्पर्धेत घवघवीत यश

पिंपरी (दै. संध्या) : महाराष्ट्र राज्य डॉजबॉल असोसिएशन व जिल्हा बुलढाणा डॉजबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली १३ वी वरिष्ठ राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धा दि. ०४ ते ०६ जून २०२६ या कालावधीत चिखली (जि. बुलढाणा) येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत पिंपरी-चिंचवड शहराच्या मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक, तर मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, शिस्त आणि जिद्दीच्या बळावर ही यशस्वी कामगिरी नोंदविली. या संघांना प्रशिक्षक मुकेश पवार, रामेश्वर हराळे, संकेत साळुंखे आणि भावना पायमोडे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल पिंपरी-चिंचवड डॉजबॉल असोसिएशनचे अध्यक्ष सत्यवान वाघमोडे, एच. ए. स्कूलच्या मुख्याध्यापिका दर्शना कोरके मॅडम, उपमुख्याध्यापक माने सर, कार्याध्यक्ष मुकेश पवार, सचिव रामेश्वर हराळे, सहसचिव चंद्रशेखर कुदळे तसेच पिंपरी-चिंचवड डॉजबॉल असोसिएशनच्या सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# फुगेवाडी विषारी दारू प्रकरणातील दाखल रुग्ण मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर

## वायसीएम रुग्णालयातील तातडीच्या उपचारांमुळे रुग्णांना मिळाले नवजीवन

पिंपरी (दै. संध्या)




फुगेवाडी विषारी दारू प्रकरणात बाधित तीनही रुग्णांची प्रकृती आता पूर्णपणे सुधारली असून त्यांना आज यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार या सर्व रुग्णांवर संपूर्णपणे मोफत उपचार करण्यात आले.

विषारी दारू सेवनामुळे गंभीर स्थितीत रुग्णांना वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात दाखल होताच तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू करण्यात आले. तसेच आवश्यक वैद्यकीय चाचण्या, औषधोपचार आणि विशेष निगा पुरविण्यात आली. रुग्णांच्या नातेवाईकांनाही वेळोवेळी आवश्यक ते सहकार्य व मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टर, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी आणि आवश्यक औषधोपचार यांच्या मदतीने रुग्णांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली.

सदर रुग्णांच्या उपचार प्रक्रियेत वायसीएम रुग्णालयाच्या मेडिसिन विभागाने अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विभागातील अनुभवी डॉक्टरांनी रुग्णांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवत आवश्यक उपचार पद्धतींचा अवलंब केला. ज्यामुळे आता सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर झाली असून ते पूर्णपणे बरे होऊन निरोगी अवस्थेत घरी परतत आहेत.

महापालिका प्रशासनाच्या तत्परतेमुळे आणि वायसीएम रुग्णालयातील वैद्यकीय यंत्रणेच्या समन्वित प्रयत्नांमुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण वाचविणे शक्य झाले. यामुळे पुन्हा एकदा वायसीएम रुग्णालयाची आपत्कालीन आरोग्य सेवा आणि तज्ज्ञ वैद्यकीय कर्मचाऱ्यांची क्षमता अधोरेखित झाली आहे.

सदर रुग्णांच्या तब्येतीत सुधारणा आणण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, वायसीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. उज्ज्वला अंदूरकर, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलजा भावसार, मेडिसिन विभागाचे प्रमुख डॉ. प्रवीण सोनी तसेच डॉ. राहुल गायकवाड, डॉ. राम मुंढे आणि डॉ. नम्रता करकनाळे यांनी विशेष परिश्रम घेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली व रुग्णांच्या उपचारादरम्यान कोणतीही कमतरता राहू नये याची काळजी घेतली.

> विषारी दारू प्रकरणातील बाधित रुग्णांना तातडीने आणि सर्वोत्तम उपचार मिळावेत यासाठी महापालिकेने आवश्यक त्या सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या. सर्व रुग्णांची प्रकृती सुधारून त्यांना घरी जाता येत आहे, ही समाधानाची बाब आहे. वायसीएम रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद आहे.
> **– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> विषारी दारू प्रकरणातील रुग्णांची स्थिती लक्षात घेऊन त्यांच्यावर तातडीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने उपचार करण्यात आले. विविध विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी समन्वयाने काम करत रुग्णांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवले. वैद्यकीय विभागाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर केलेल्या उपचारांमुळे सर्व रुग्णांची प्रकृती पूर्णपणे सुधारणे शक्य झाले.
> **– डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> आपत्कालीन परिस्थिती तज्ज्ञ डॉक्टरांनी आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी रुग्णांवर अत्यंत दक्षतेने उपचार केले. रुग्णांची प्रकृती सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व तपासण्या, औषधोपचार आणि सुविधा वायसीएम रुग्णालयामार्फत वेळेत व मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या.
> **– डॉ. अभयचंद्र दादेवार, अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

## २ लाख आठ हजारांचा गुटखा जप्त; पोलिसांकडून एकाला अटक

पिंपरी (दै. संध्या)



वाकड पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या एका व्यक्तीविरोधात कारवाई करत सुमारे २ लाख ८ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ जून रोजी सायंकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास वाकड येथील कॅस्पटे वस्ती रोड परिसरातील एका चाळीतील खोली क्र.२ मध्ये ही कारवाई करण्यात आली. आरोपी किरणसिंग मोहनसिंग सोळंकी (वय ३२, रा. आण्णाभाऊ साठे नगर, वाकड, पुणे) याला ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी पोलीस शिपाई ज्ञानदेव मुरलीधर झेंडे यांनी फिर्याद दिली आहे. आरोपीकडे शासनाने प्रतिबंधित केलेला पान मसाला, सुगंधित तंबाखू, गुटखा व अन्य तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून आला. आरोग्यास अपायकारक असलेल्या या पदार्थांची विक्री करताना आरोपी रंगेहाथ सापडल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३, तसेच अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास वाकड पोलीस करीत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी विज्ञान केंद्र यांच्यामार्फत शेतकरी प्रशिक्षण वर्ग संपन्न

तरडोली (मोरगाव) (दैनिक संध्या) : आज मौजे तरडोली येथील तुकाईनगर येथे तुकाईमाता मंदिर मध्ये खरीप हंगाम २०२६ मधील खरीप हंगामामध्ये राबवण्यात येणाऱ्या मोहिमा याविषयी श्री.सचिन हाके तालुका कृषि अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी NISAM चे संग्राम चव्हाण यांनी या संशोधन संस्थे मार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच संतोष गोडसे सर कृषि विज्ञान केंद्र,शारदानगर यांनी कृषी विज्ञान केंद्र (केव्हीके) मार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची शेतकऱ्यांना माहिती दिली.तसेच उपकृषी अधिकारी श्री.लोधाडे साहेब यांनी या खरीप हंगामामध्ये राबवण्यात येणाऱ्या मोहिमा याविषयी माहिती दिली. तसेच श्री.मासाळ साहेब यांनी कृषी विभागामार्फत राबवणाऱ्या योजना आणि महाकृषी विस्तार AI अँप विषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी महेंद्र तांबे सरपंच, मंगेश खताळ अध्यक्ष,संतोष धायगुडे प्रगतशील शेतकरी आणि तरडोली,मोरगाव परिसरातील शेतकरी भरपूर संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन श्री. भिमराव लोणकर सहाय्यक कृषी अधिकारी यांनी केले होते.

### ग्रामपंचायत सदस्य आरक्षण सोडत 12 जून रोजी-तहसीलदार स्वप्नील रावडे

बारामती (दैनिक संध्या) : राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देश व मार्गदर्शक सूचनेप्रमाणे तालुक्यातील ५३ ग्रामंपचायतीमध्ये ग्रामपंचायत सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम १२ जून रोजी होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या २५ मे २०२६ रोजीच्या आरक्षण सोडतीबाबत मार्गदर्शक सूचना तसेच २६ मे २०२६ रोजीच्या निर्देशाप्रमाणे राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकासाठी सदस्यांचा आरक्षण सोडत कार्यक्रम होणार आहे. या सोडत कार्यक्रमाकरिता ग्रामपंचायत निहाय अध्याक्षी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच गटविकास अधिकारी यांनी नियुक्त केलेले ग्रामपंचायत अधिकारी हे सहायक अध्याक्षी अधिकारी म्हणुन कामकाज पाहणार आहेत.

आरक्षण सोडती होणाऱ्या ग्रामपंचायती : खराडेवाडी, कन्हेरी, पाहुणेवाडी, झारगडवाडी, वाकी, वडगांव निंबाळकर, उंडवडी सुपे, तरडोली, सोनगाव, शिरसने, सांगवी, पिंपळी, निंबुत, नारोळी, मोढवे, मेखळी, माळवाडी लोणी, माळवाडी लाटे, कोऱ्हाळे बु, कटफळ, जैनकवाडी, जोगवडी, होळ, देऊळगाव रसाळ, बऱ्हाणपूर, मोराळवाडी आणि कोळोली या ग्रामपंचायतीमध्ये सकाळी १० वाजता तर ग्रामपंचायत मळद, वढाणे, सोनवडी सुपे, शिरवली, सावळ, निरावागाज, माळेगाव खुर्द, लाटे, खांडज, खंडोबाचीवाडी, थोपटेवाडी, कांबळेश्वर, कारखेल, जळगाव सुपे, सस्तेवाडी, सदोबचिवाडी, घाडगेवाडी, गोजुबावी, ढेकळवाडी, ढाकाळे, खामगळवाडी, चोपडज, बाबूर्डी, आंबी खुर्द, अंजनगाव आणि मुर्टी येथे दुपारी ३ वाजता आरक्षण सोडत कार्यक्रम होणार आहे, असे तहसीलदार स्वप्नील रावडे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

### जुन्नरच्या सिद्धीची थेट अमेरीकेत गगनभरारी



नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील राजुरी येथील सिद्धी अनंत हाडवळे हिने अवघ्या २०व्या वर्षी अमेरिकेत व्यवसायिक वैमानिक कमर्शियल पायलट प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करत अंतिम पायलट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे राजुरी गावासह संपूर्ण जुन्नर तालुक्यात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून तिचे कौतुक केले जात आहे. लहानपणापासूनच आकाशात झेप घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सिद्धीने आपल्या जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातून जागतिक स्तरावरील करिअरची वाट निवडणे सोपे नव्हते. मात्र अनेक अडचणी आणि आव्हानांवर मात करत तिने आपले ध्येय साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले.वैमानिक होण्यासाठी आवश्यक असलेले उच्च दर्जाचे प्रशिक्षण घेण्यासाठी सिद्धी अमेरिकेत गेली. नवीन देश, वेगळी संस्कृती आणि कठोर प्रशिक्षण प्रक्रियेला सामोरे जात तिने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. उड्डानाचे आवश्यक तास पूर्ण करत तिने सर्व परीक्षा यशस्वीरित्या पार केल्या आणि अखेर कमर्शियल पायलट होण्याचे स्वप्न साकार केले. सिद्धीच्या या यशामुळे जुन्नर तालुक्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहे. विशेषत: ग्रामीण भागातील तरुण-तरुणींना मोठी स्वप्ने पहाण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घेण्याची प्रेरणा तिच्या यशोगाथेतून मिळत आहे. शिक्षण ,चिकाटी आणि समर्पणाच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे तिने आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. आज सिद्धी हाडवळेच्या यशाचा आनंद केवळ तिच्या कुटुंबापुरता मर्यादित नसून संपूर्ण जुन्नर तालुका आणि महाराष्ट्रासाठी तो अभिमानाचा क्षण ठरला आहे . तिची ही प्रेरणादायी भरारी अनेक युवक -युवतींना त्यांच्या स्वप्नांच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करण्याची प्रेरणा देणारी ठरत आहे.

# शिवजन्मभूमी जुन्नरच्या विकासाला नवी चालना

नारायणगाव (दै. संध्या)





जुन्नर तालुक्यातील ऐतिहासिक शिवजन्मभूमी परिसराच्या विकासासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून विविध विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. इतिहासकालीन जुन्नर तालुक्यात प्रत्येकी तीन कोटी रुपये खर्चाच्या सहा भव्य प्रवेशद्वारांचे बांधकाम करण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक निधी शासनाकडून मंजूर करून घेण्यात आला आहे.शिवनेरी किल्ल्याच्या परिसरात आकर्षक प्रवेशद्वारे उभारण्यासह पर्यटनाला चालना देणाऱ्या 'बिबट सफारी' प्रकल्पालाही मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे जुन्नर तालुक्याच्या पर्यटन विकासाला नवी गती मिळणार आहे. पुढील महिन्यात या प्रकल्पाचे भूमिपूजन होणार असल्याची माहिती आमदार शरद सोनवणे यांनी दिली. शिवनेरी गडाच्या पायथ्याशी जुन्नर शहरातील पाच रस्ता चौकात छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ आयोजित शिवराज्याभिषेक सोहळ्यात ते बोलत होते. शिवजन्मभूमी म्हणून ओळख असलेल्या जुन्नरमध्ये दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक आणि शिवप्रेमी भेट देतात. त्यांच्या सोयीसाठी पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे.

प्रवेशद्वारे, सुशोभीकरण आणि पर्यटनविषयक सुविधा उभारल्यामुळे परिसराचे आकर्षण वाढणार असून स्थानिक रोजगाराच्या संधीही निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेची घोषणा १ मे १९६० रोजी किल्ले शिवनेरीवर करण्यात आली होती. त्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ यापुढे प्रत्येक वर्षी १ मे महाराष्ट्र दिन जुन्नरमध्ये भव्य स्वरूपात साजरा केला जाणार असल्याचे सांगत आमदार शरद सोनवणे यांनी शिवजन्मभूमीचे पावित्र्य जपण्याचे आवाहन केले. यावेळी भाजप नेत्या आशा बुचके, हभप संग्राम बापू भंडारे, नगराध्यक्ष सुजाता काजळे,नगरसेवक अलका फुलपगार, बाजार समितीचे संचालक संतोष चव्हाण, उपसभापती अमित ढोले, मयुर महाबरे, विक्रम परदेशी, अंजली शिंदे, रुपाली परदेशी, निलेश गुंजाळ,बाळासाहेब गाजरे, अनुजा पातूरकर, दर्शन फुलपगार, सुवर्णा जाधव, राजश्री खोंड,अनिल रोकडे, भाऊ कुंभार, नंदकुमार तांबोळी,समीर पुरवंत,सुरज नानावटी,विकी गोसावी आदींसह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व शिवभक्त उपस्थित होते. दरम्यान, शिवव्रत सोहळ्याचे आयोजन उत्साहात पार पडले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, ऐतिहासिक सादरीकरणे आणि शिवचरित्रावर आधारित उपक्रमांमुळे नागरिकांचा मोठा सहभाग दिसून आला.

यावेळी जुन्नरमधील ५५ कलाकारांनी शिवप्रताप सोहळा हे ऐतिहासिक नाटक सादर केले.यावेळी शिवनेरी व जुन्नरच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे योगदान देण्याचे आवाहन मान्यवरांनी केले.

## मांजरीने खाल्ला अंगठीचा धोंडा; घरच्यांची धावपळ

नारायणगाव (दै. संध्या)



सध्या अधिकमास सुरु आहे आणि या अधिकमासात जावयाचा मोठा मान असतो. प्रत्येक सासरा आपल्या जावयाला वाण देताना सोन्याच्या स्वरूपात काहीतरी वस्तू देत असतो. मात्र, जावयासाठी केलेला धोंडा मांजरीने खाल्ल्याचा प्रकार समोर आला आहे. धोंड्याच्या महिन्यासाठी आलेल्या जावयाला सरप्राईज देण्यासाठी अंगठी धोंड्यात ठेवून तो इतर धोंड्यांसोबत ठेवला. मात्र, स्वयंपाकानंतर आवराआवरी सुरू असताना घरात आलेल्या मांजरीने नेमका तोच धोंडा खाऊन टाकला, त्यामुळे घरच्यांची धांदळ उडाली.

गिळलेली अंगठी परत मिळावी म्हणून मांजरीला चार दिवस घरात बांधून ठेवण्यात आले. विष्ठेतून ही अंगठी बाहेर पडेल अशी अपेक्षा होती. मात्र, तसे न झाल्याने तिला पशुवैद्यकाकडे नेऊन उलटीसाठी औषधे देण्यात आले. परंतु मांजरीला उलटी झाली नाही उलट त्यात मांजरीचा जीव गेला. त्यानंतर मृत मांजरीच्या पोटावर शस्त्रक्रिया करून सोन्याची अंगठी बाहेर काढण्यात आली. या विचित्र घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मांजरीने अंगठी गिळल्यामुळे जावयाला वाणाच्या दिवशी आहेरासाठी आणलेल्या कपड्यांवरच समाधान मानावे लागले . मात्र, मांजर मेल्यावर तिच्या पोटातील अंगठी बाहेर काढण्यात आली आहे.

## धडक मोहिम : राजगुरुनगर व्यापारी असोशिएनकडून स्वागत

राजगुरुनगर (दै. संध्या)



नागरिकांच्या आरोग्याच्या हिता करिता राज्य अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सुरू असलेल्या धडक मोहिमेचे राजगुरुनगर व्यापारी असोशिएन कडून स्वागत करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर येथे व्यापारी महासंघाच्या वतीने महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत व्यापारी, व विविध व्यावसायिक दुकानदार, प्रतिष्ठानांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी व्यवसायाबाबत प्रशासनाने दिलेल्या नियमावली व अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. प्रसिद्ध कार्यक्षम अधिकारी तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्र राज्य अन्न व औषध प्रशासन विभागाची सूत्रे हाती घेताच राज्यभर भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्या दुकानदारांची तपासणी व कारवाईची मोहीम राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर येथे व्यापारी महासंघाच्या वतीने महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत भेसळयुक्त पदार्थांची विक्री कोणत्याही परिस्थितीत केली जाणार नाही तसेच अशा प्रकारांना व्यापारी वर्गाने थारा देऊ नये, असा एकमुखी निर्णय घेण्यात आला. याशिवाय व्यावसायिक आस्थापनांमध्ये कार्यरत कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेबाबत विशेष चर्चा करण्यात आली. कामगारांना सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रत्येक व्यावसायिकाची जबाबदारी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कामगारांच्या आरोग्याची नियमित तपासणी, स्वच्छता, सुरक्षित कामकाजाची साधने तसेच आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सर्वांनी सकारात्मक भूमिका घेतली.

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. ग्राहकांना दर्जेदार व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी व्यापाऱ्यांनी सतर्क राहावे, असेही बैठकीत नमूद करण्यात आले.या मुख्य विषयाव्यतिरिक्त,शहरातील पार्किंग व्यवस्था,ट्रान्सपोर्ट भाडेवाढ या व इतर काही विषयांवर चर्चा करण्यात आली.. त्यामुळे राजगुरुनगर परिसरात सुरक्षित, पारदर्शक व जबाबदार व्यापार संस्कृतीला अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीचे सूत्रसंचालन माणिक होरे व प्रास्ताविक स्वानंद खेडकर यांनी केले तर नियमावली बाबत विनय लोढा आणि सचिन कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन चंदन खारीवाल यांनी केले . बैठक यशस्वी पार पाडण्यासाठी,शाम चौधरी,अमर टाटिया,प्रविण शेटे,सूरज वाडेकर,राहुल वाळुंज,दिलीप तापकीर,श्रवणराम पटेल,जितेंद्र चव्हाण,सतिश थिगळे,पवन गदिया,विशाल कहाणे यांसह अनेक प्रतिनिधींनी प्रयत्न केले.. या बैठकीला नगरसेवक दिनेशभाऊ सांडभोर,फैजभाई मोमीन तसेच ज्येष्ठ व्यापारी प्रदीपशेठ कासवा,बाळासाहेब सांडभोर,कुशलशेठ ओसवाल आवर्जून उपस्थित होते.

## अक्षय सुळ यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

पाटस (दै. संध्या)



पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत युवा उद्योजक अक्षय सुळ यांच्या वाढदिवसानिमित्त पाटस येथे वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करून परिसर हिरवागार करण्याचा संकल्प करण्यात आला. वाढदिवस साजरा करण्यासाठी केवळ केक कापणे किंवा अन्य औपचारिक कार्यक्रम न करता समाजोपयोगी उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांनी पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या उपक्रमासाठी श्री नागेश्वर ज्येष्ठ मैत्री ग्रुप यांनी विशेष सहकार्य केले. ग्रुपच्या सदस्यांनी वृक्षलागवडीसह रोपांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारत पर्यावरणपूरक उपक्रमांना नेहमीच प्रोत्साहन देण्याची भूमिका मांडली.

अक्षय सुळ यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देणाऱ्या सर्वांचे आभार मानत, प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन केले.

वृक्षारोपणामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होत असून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमास पाटसगावचे मा.सरपंच योगेंद्र बाबा शितोळे, बबन म्हस्के, वाल्मीक आव्हाड, लक्ष्मण शितोळे, गोरख सुतार, नंदकुमार चिंचकर, भालचंद्र मोरे, अशोक म्हस्के, हरीभाऊ शाळू, अशोक पवार, सुरेश पवार, भानुदास बोबडे ,परिसरातील नागरिक, मित्रपरिवार तसेच श्री नागेश्वर ज्येष्ठ मैत्री ग्रुप पाटसचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर सर्वांनी लावलेल्या रोपांचे नियमित संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## जयंती साजरी

लोणी काळभोर (दै. संध्या) : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर चे संस्थापक, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०८ वी जयंती समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात अत्यंत उत्साहात आणि आदरापूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात शिक्षणमहर्षी डॉ.बापूजींच्या प्रतिमेचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. आपल्या मनोगतात डॉ. संभाजी निकम यांनी डॉ.बापूजींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' हे ब्रीदवाक्य घेऊन ग्रामीण भागातील तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवण्याचे महनीय कार्य डॉ.बापूजींनी केले, असे प्रतिपादन करण्यात आले.

## जिल्हा कामगार कार्यकर्त्यांची बैठक संपन्न

नारायणगाव (दै. संध्या)



भारतीय जनता पार्टी पुणे जिल्हा कामगार मोर्चाची कार्यकर्ता संवाद बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत पुणे जिल्हा कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष किरणभाऊ राक्षे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच भारतीय जनता पक्षाचे पुणे जिल्हा सरचिटणीस दत्ताभाऊ गव्हाणे, राहुलभाऊ चौधरी, संजय भाऊ काळे ,भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष संतोषनाना खैरे, मंडळाध्यक्ष आशिषभाऊ माळवदकर, निलेश भाऊ चव्हाण विविध पदाधिकारी ,महिला भगिनी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी किरणभाऊ राक्षे यांनी कामगार मोर्चाच्या माध्यमातून संघटन बळकटीकरण, कामगारांचे प्रश्न, जनसंपर्क आणि पक्ष विस्तार या संदर्भात मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी व प्रश्न जाणून घेतले. बैठकीनंतर किरणभाऊ राक्षे यांनी श्री विघ्नहराचे दर्शन घेऊन अभिषेक केला. याप्रसंगी श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. संघटन संवाद आणि श्रद्धा यांचा संगम घडवणारी ही बैठक प्रेरणादायी ठरली.या कार्यक्रमाचे सुंदर नियोजन श्री परागभाऊ बेलापूरकर व किरण भाऊ फाकटकर भाजपा ओझर यांनी केले होते.

# विद्यार्थ्यांना पोलीस कामकाज, कायदेविषयक जनजागृती, सायबर सुरक्षा व व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण

बारामती (दै. संध्या)



आज दिनांक 09/06/2026 रोजी दुपारी 02.00 ते 03.00 या वेळेत जनहित प्रतिष्ठानचे प्राथमिक विद्यालय, बारामती, जि. पुणे येथील एकूण 105 विद्यार्थी व 10 शिक्षक यांनी बारामती शहर पोलीस स्टेशनला शैक्षणिक भेट दिली. सदर भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना पोलीस विभागाचे कार्य, कायद्याचे महत्त्व, नागरिकांची कर्तव्ये, सायबर सुरक्षा, वाहतूक नियम, बाल संरक्षण, व्यसनमुक्ती, व्यक्तिमत्त्व विकास तसेच सुजाण नागरिकत्व या विविध विषयांवर सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले.

सदर शैक्षणिक भेटीचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांना पोलीस विभागाची कार्यपद्धती प्रत्यक्ष समजावून सांगणे, त्यांच्या मनातील पोलिसांविषयी असलेला अनाठायी धाक दूर करणे, कायद्याविषयी आदर निर्माण करणे तसेच भावी काळात जबाबदार, सजग व कायद्याचे पालन करणारे नागरिक घडविणे हा होता.

यावेळी विद्यार्थ्यांना बारामती शहर पोलीस स्टेशनमधील विविध विभागांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे कामकाज समजावून सांगण्यात आले. यामध्ये तक्रार कक्ष, पासपोर्ट पडताळणी विभाग, गोपनीय शाखा, मुद्देमाल कक्ष, लॉकअप रूम, चरित्र पडताळणी विभाग, तपास पथक, सीसीटीएनएस प्रणाली, स्टेशन डायरी, नागरिक सेवा विभाग तसेच इतर प्रशासकीय शाखांची माहिती देण्यात आली. पोलीस स्टेशनमध्ये नागरिकांच्या तक्रारी कशा स्वीकारल्या जातात, गुन्ह्यांची नोंद कशी होते, तपासाची प्रक्रिया कशी राबविली जाते, पुरावे कसे जतन केले जातात तसेच नागरिकांना विविध पोलीस सेवा कशा उपलब्ध करून दिल्या जातात याबाबत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणांसह माहिती देण्यात आली.

बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या गुड टच व बॅड टच या विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सुरक्षित व अयोग्य स्पर्श यातील फरक, अशा प्रसंगी तात्काळ कोणाला माहिती द्यावी, स्वतःचे संरक्षण कसे करावे, पालक, शिक्षक किंवा पोलीसांची मदत कशी घ्यावी याबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला.

तसेच विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचे महत्त्व पटवून देण्यात आले. तंबाखू, गुटखा, सिगारेट, मद्यपान तसेच इतर व्यसनांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले. चुकीच्या संगतीमुळे विद्यार्थ्यांच्या जीवनावर होणारे दुष्परिणाम, शिक्षणातील नुकसान तसेच गुन्हेगारीकडे होणारी वाटचाल याबाबत जागृती करण्यात आली. चांगल्या सवयी, शिस्त, सकारात्मक विचार व योग्य मित्रपरिवार यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

वाहतूक सुरक्षेअंतर्गत विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षितपणे कसा ओलांडावा, झेब्रा क्रॉसिंगचा वापर कसा करावा, वाहतूक सिग्नलचे पालन का आवश्यक आहे, वाहनांपासून सुरक्षित अंतर कसे राखावे, हेल्मेट व सीट बेल्टचे महत्त्व, तसेच अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अपघात झाल्यास घाबरून न जाता तात्काळ आपत्कालीन सेवांशी संपर्क साधणे, जखमींना सुरक्षित मदत करणे आणि पोलीसांना माहिती देणे याविषयी माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांना पोलीस विभागाकडे उपलब्ध असलेल्या विविध शस्त्रांची माहिती देण्यात आली. विविध प्रकारची शस्त्रे, त्यांचे कार्य, वापराचे नियम, सुरक्षित हाताळणी तसेच कायद्याच्या चौकटीत आणि नागरिकांच्या संरक्षणासाठी त्यांचा कसा वापर केला जातो याबाबत माहिती देण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांना कायदा म्हणजे काय?, कायद्याचे पालन का आवश्यक आहे?, जबाबदार नागरिक कसा असावा?, संविधानाने दिलेले अधिकार व नागरिकांची कर्तव्ये कोणती?, तसेच समाजात शांतता, सुव्यवस्था व सौहार्द राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका काय असते? याविषयी सोप्या व समजण्यासारख्या भाषेत मार्गदर्शन करण्यात आले.

सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी मोबाईल फोन, सोशल मीडिया, ऑनलाईन गेमिंग, फेक लिंक, ओटीपी फसवणूक, बनावट वेबसाईट, सोशल मीडिया अकाउंट हॅकिंग, ऑनलाईन आर्थिक फसवणूक यासारख्या विषयांवर विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. कोणतीही वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये, संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये तसेच कोणत्याही प्रकारचा सायबर गुन्हा झाल्यास तात्काळ पालक, शिक्षक किंवा पोलीसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

तसेच विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनमध्ये तक्रार कशी नोंदवावी, आपत्कालीन परिस्थितीत पोलीसांची मदत कशी घ्यावी, नागरिकांनी पोलीसांना कोणती माहिती द्यावी आणि कायदेशीर प्रक्रियेमध्ये नागरिकांचे सहकार्य का महत्त्वाचे असते याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.


सदर प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. पोलीस अधिकारी व अंमलदारांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देऊन त्यांचे शंकानिरसन केले.

बारामती शहर पोलीस स्टेशनतर्फे अशा प्रकारच्या जनजागृतीपर उपक्रमांद्वारे विद्यार्थी, पालक व नागरिकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करणे, पोलीस व नागरिक यांच्यात विश्वासाचे नाते अधिक दृढ करणे तसेच समाजात सुरक्षित, सुसंस्कृत, शिस्तबद्ध व जबाबदार नागरिक घडविण्याचा प्रयत्न सातत्याने करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण उपक्रम माननीय पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण श्री. संदीप सिंह गिल, माननीय अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार तसेच माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती विभाग डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीशैल रामचंद्र चिवडशेट्टी यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला.




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे



### धान खरेदी उद्दिष्टात २९.५ लाख क्विंटलची वाढ

मुंबई (दैनिक संध्या) : किमान आधारभूत किंमत (MSP) खरेदी योजनेअंतर्गत पणन हंगाम 2025-26 (रब्बी) साठी महाराष्ट्राच्या धान खरेदी उद्दिष्टात केंद्र शासनाने अतिरिक्त 29.5 लाख क्विंटल वाढ मंजूर केली आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्याला ही वाढीव मंजुरी मिळाली आहे. शेतकरी व लोकप्रतिनिधींकडून धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांनी 27 मे 2026 रोजी नवी दिल्ली येथे केंद्र शासनस्तरीय बैठकीत महाराष्ट्रासाठी रब्बी हंगामातील धान खरेदी उद्दिष्ट वाढविण्याची मागणी केली होती. या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद देत केंद्र शासनाने राज्याला अतिरिक्त 29.5 लाख क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट मंजूर केले आहे. यापूर्वी मंजूर झालेल्या 59.5 लाख क्विंटल उद्दिष्टासह आता महाराष्ट्राचे एकूण धान खरेदी उद्दिष्ट 89 लाख क्विंटलवर पोहोचले आहे. रब्बी हंगामासाठी मागील काही वर्षांच्या तुलनेत हे सर्वाधिक उद्दिष्ट आहे. अन्न, नागरी पुरवठा मंत्री श्री भुजबळ यांनी केंद्र शासनाचे आभार मानत या निर्णयामुळे राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल तसेच त्यांच्या उत्पादनाला हमीभावाने बाजारपेठ उपलब्ध होईल, असा विश्वास व्यक्त केला.

### अखेर गोकुळ गीतेंनी सस्पेन्स संपवला

मुंबई (दैनिक संध्या) : सध्या राज्यात विधानपरिषद निवडणुकीमुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. महायुतीमध्ये नाशिकच्या जागेवर बंडखोरी झाली आहे. भाजपाचे नेते गोकुळ गीते यांनी काहीही झालं तरी मी ही निवडणूक लढवणार आहे, अशी भूमिका घेतली आहे. त्यांची मनधरणी करण्यासाठी तसेच गीते यांनी महायुतीच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा यासाठी भाजपाचे संकटमोचक गिरीश महाजन तसेच शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते उदय सामंत हे गीते यांच्या संपर्कात आहेत. परंतु अद्यापही गीते यांचे मन वळवण्यात यश आलेले नाही. दरम्यान, आता खुद्द गोकुळ गीते यांनीच समोर येत महायुतीच्या उमेदवाराच्या पाठिंब्याविषयी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. गोकुळ गीते यांच्या भूमिकेमुळे महायुतीमधील नाशिकचा तिढा जास्तच वाढला आहे. मिळालेल्या माहितीनुसार गोकुळ गीते यांनी या निवडणुकीतून माघार घ्यावी आणि महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना पाठिंबा द्यावा यासठी भाजपा आणि शिंदे यांच्या शिवसेनेकडून प्रयत्न चालू आहेत. मंत्री उदय सामंत आणि गिरीश महाजन यांची आणि गोकुळ गीते यांची नाशिकच्या ओझर विमानतळावर भेट झाली आहे. गीते यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली आहे. लवकरच गुडन्यूज मिळेल, अशी आशा गिरीश महाजन यांनी व्यक्त केली आहे.

### एकनाथ शिंदेंना आमंत्रण नाही... शिवसेना नाराज

मुंबई (दैनिक संध्या) : काही दिवसांपूर्वी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजाच्या राज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्ताने नवी मुंबईतील विमानतळावर शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला होता. मात्र या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण देण्यात आले नव्हते. त्यामुळे शिवसेना नेत्यांनी नाराजी व्यक्त केली होती. अशातच आता याचे पडसाद आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत उमटले. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण देण्यात आले नसल्याचे पडसाद आजच्या बैठकीत पहायला मिळाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण न दिल्यामुळे शिवसेनेच्या मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर नाराजी व्यक्त केली. यावेळी सेनेच्या मंत्र्यांनी सिडको, राजशिष्टाचार आणि विमानतळ प्राधिकरणातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. शिवसेनेच्या या मागणीनंतर मुख्यमंत्र्यांनीही याबाबत गंभीर दखल घेऊन चौकशीचे आदेश दिले आहेत.

### गायमुख ते फाउंटन हॉटेल बोगदा, भाईंदर उन्नत पूल आणि नवी मुंबई

# मेट्रो विस्ताराला मुख्यमंत्र्यांची मान्यता

**मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत २२ हजार ६११ कोटी रूपयांच्या प्रस्तावाला मान्यता**

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी घोडबंदर रस्त्यावरील गायमुख ते फाउंटन हॉटेल भुयारी मार्ग व फाउंटन हॉटेल ते भाईंदर उन्नत पुलाच्या 17 हजार 36 कोटी; तसेच नवी मुंबई मेट्रो मार्ग 1ए आणि मार्ग 2 च्या 5 हजार 575 कोटी, अशा एकूण 22 हजार 611 कोटी रुपयांच्या प्रस्तावांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. पायाभूत सुविधांचे प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याने वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ आणि वेगवान होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची मंत्रालयात आज मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह प्रशासनातील विविध वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. गायमुख



ते फाउंटन हॉटेल दरम्यान 5.86 किलोमीटर लांबीचा सहा पदरी भुयारी मार्ग आणि फाउंटन हॉटेल ते भाईंदर दरम्यान 9.58 किलोमीटर लांबीचा सहा पदरी उन्नत पूल उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे पश्चिम मुंबईला ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक, पनवेल; तसेच राष्ट्रीय महामार्ग-48च्या दृष्टीने अधिक वेगवान आणि सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध होईल. हा भुयारी मार्ग टीबीएम तंत्रज्ञानाद्वारे उभारण्यात येणार असून, त्याचा व्यास 14 मीटर असेल. सुमारे पाच वर्षांत हा बोगदा पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तर वसई खाडीला समांतर जाणाऱ्या उन्नत पुलावर ताशी 100 किलोमीटर वेगाने वाहतूक शक्य होणार आहे. घोडबंदर मार्गावरील वाढती वाहतूक आणि जड वाहनांचा ताण कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असून विशेषतः ठाणे व गुजरातच्या दिशेने जाणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणे शक्य होणार आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' मॉडेलद्वारे करण्यात येणार आहे. केंद्र व राज्य शासनाकडून 'व्हायबिलिटी गॅप फंडिंग' उपलब्ध करून देण्यात येणार आहे; तसेच प्रकल्प परिसरात एमएमआरडीएला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी मान्यता दिली.

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग 1ए (सागर संगम ते सीबीडी बेलापूर) आणि मेट्रो मार्ग 2 (पेंधर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-4) या प्रकल्पास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. या प्रकल्पामुळे सागर संगम ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा एकूण 28 किलोमीटरचा सलग मेट्रो मार्ग उपलब्ध होणार आहे. या विस्तारामध्ये मार्ग 1ए वर दोन आणि मार्ग 2 वर अकरा स्थानकांचा समावेश आहे. भविष्यात दररोज सुमारे 12 लाख प्रवाशांना या मेट्रो सेवेचा लाभ मिळणार आहे.

## 'दिलखुलास' 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात विजय कोळेकर यांची विशेष मुलाखत



■ मुंबई (दै. संध्या)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे तत्कालीन कृषी विद्या तथा मृदा विज्ञान विशेषज्ञ विजय कोळेकर यांची हवामान अनुकूल तंत्रज्ञान व शाश्वत शेती व्यवस्थापन' या विषयावर विशेष मुलाखत प्रसारित करण्यात येणार आहे. 'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून दि. ११ ते १६ जून २०२६ या कालावधीत सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. आणि 'न्यूज ऑन एआयआर' या ॲपवर देखील मुलाखतीचे प्रसारण होणार आहे. तसेच 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत गुरुवार दि. ११ जून २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता महासंचालनालयाच्या समाज माध्यमांवरून प्रसारित करण्यात येणार आहे. निवेदिका सुषमा जाधव यांनी ही मुलाखत घेतली आहे. हवामान बदलामुळे शेती क्षेत्रासमोर निर्माण होत असलेल्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हवामान अनुकूल तंत्रज्ञान, जलसंधारण, कमी मशागत, रुंद वखारावरील लागवड, हवामान अनुकूल बियाण्यांची निवड, बीजप्रक्रिया, डीएसआर पद्धती, नैसर्गिक व सेंद्रिय शेती, ठिबक सिंचन, फर्टिगेशन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, सुरक्षित फवारणी तंत्रज्ञान, काढणीपश्चात व्यवस्थापन, कृषी यांत्रिकीकरण तसेच डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा शेतीमधील वापर आदी विषयांवर या मुलाखतीत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. 'महाविस्तार एआय – शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र' या उपक्रमाची माहिती, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पुढील काळातील शेतीतील अपेक्षित बदल, युवकांसाठी उपलब्ध होत असलेल्या कृषी क्षेत्रातील नव्या संधी आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा लाभ घेण्यासाठीची प्रक्रिया याविषयीदेखील श्री. कोळेकर यांनी तपशीलवार माहिती दिली आहे.

## आय.एम.आय.एस प्रणालीत पूर्ण माहिती भरावी – मंत्री गुलाबराव पाटील

■ मुंबई (दै. संध्या)

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ विधानसभा मतदारसंघातील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत सहा गावांची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित गावामधील योजनांची कामे पूर्ण क्षमतेने चालू आहेत, तसेच योजनेच्या अंमलबजावणी करण्यासाठी आय.एम.आय.एस (इंटिग्रेटेड मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम) प्रणाली मध्ये पूर्ण माहिती भरावी, असे निर्देश पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.



शिरोळ विधानसभा मतदारसंघातील जल जीवन योजनेच्या कामांबाबत मंत्रालयात श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. शिरोळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेंद्र पाटील (यड्रावकर), पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन – नैनुटीया, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव श्रीरंगा नायक, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी प्रशांत भामरे, पुणे येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंत्या वैशाली आवटे, कोल्हापूर येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता डी. के. पाटील, कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अर्जुन गोळे, उपअभियंता एस.एस.लोहार उपस्थित होते. कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन या दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाल्या होत्या.

श्री. पाटील म्हणाले की, शिरोळ विधानसभा मतदारसंघातील १५ नळ पाणीपुरवठा योजना तांत्रिक कारणांमुळे हस्तांतरित झाल्या नाहीत. त्यापैकी एका गावच्या नळ पाणी पुरवठा योजनेअंतर्गत महावितरणचे काम पूर्ण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर करावा. यावेळी जल जीवन मिशन कार्यक्रमातील शिरोळ तालुक्यातील हरोली, नांदणी आणि यड्राव नळपाणी पुरवठा योजनेचा आढावा घेऊन मंत्री पाटील यांनी नवे दानवाड नळ पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव पाठवावा, तसेच लोकप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घ्यावी, असे निर्देश दिले.

## व्यापकस्तरावर अंमलबजावणीचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

शालेय शिक्षणात गुणवत्तावृद्धी घडवत विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, संवादकौशल्य आणि चांगल्या नागरिकत्वाचे गुण विकसित करण्यासाठी मूल्य शिक्षणाला विशेष महत्त्व आहे. सजग आणि जबाबदार नागरिक घडवण्यासाठी मूल्य आधारित शिक्षण काळाची गरज आहे.या पार्श्वभूमीवर राज्यात मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याची (2.0) अंमलबजावणी व्यापक स्तरावर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या परिणाम साध्यतेच्या मूल्यमापनाचा आढावा घेण्यात आला त्या वेळी ते बालत होते.

## मुंबईच्या आरोग्य व्यवस्थेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करा – आशिष शेलार

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबईकरांना जागतिक दर्जाची आणि अधिक कार्यक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, तसेच प्रशासकीय कार्यपद्धतीचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक सुधारणा सुचविणारा सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देश मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले. महानगरपालिका रुग्णालयांतील बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) आणि स्वच्छतागृहांची स्थिती तातडीने सुधारण्याचे आदेश देत आरोग्य सेवांचा नियमित आढावा घेतला जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आधुनिकीकरणासंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, महापौर रितू तावडे, आमदार, महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री ॲड.शेलार यांनी राज्याच्या आरोग्य विभाग, नगरविकास विभाग आणि महानगरपालिका प्रशासन यांच्यातील समन्वय वाढविण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत स्वतंत्र बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिले. जागतिक आणि राष्ट्रीय निकषांनुसार आरोग्य सेवा



उभारण्यासाठी आर्थिक तरतुदींपलीकडे जाऊन आधुनिक 'मेडिटेक' तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी व्यक्त केली. महापौर रितू तावडे यांनी आरोग्य विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याची गरज व्यक्त केली. कोविड काळात कंत्राटी तत्त्वावर सेवा बजावलेल्या मनुष्यबळाला भरती प्रक्रियेत प्राधान्य देण्याची सूचना त्यांनी केली. सिद्धार्थ, राजावाडी आणि इतर रुग्णालयांच्या रखडलेल्या पुनर्विकास कामांना गती देण्याबरोबरच नर्सिंग कॉटेज, झिरो प्रिस्क्रिप्शन सेवा, कूपर रुग्णालयात ईएमएस वॉर्ड, केईएममध्ये एआरटी विभाग आणि शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात मॉड्युलर ऑपरेशन थिएटर उभारण्याचे निर्देशही त्यांनी महापालिकेला दिले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या धर्तीवर 'महापौर वैद्यकीय सहायता कक्ष' स्थापन करून रुग्णांना मदत करण्यासाठी पारदर्शक आणि सुलभ व्यवस्था विकसित करण्याचा प्रस्तावही महापौरांनी मांडला.

## नेत्रदान जनजागृती, वृक्षारोपण आणि योग अभियानास प्रारंभ मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

■ मुंबई (दै. संध्या)

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरणाबाबत जागरूकता आणि निरोगी जीवनशैलीची जाणीव निर्माण व्हावी यासाठी राष्ट्रीय सेवा योजना आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने जागतिक नेत्रदान दिन, जागतिक पर्यावरण दिन आणि आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या राज्यस्तरीय अभियानाचा शुभारंभ उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत(दादा) पाटील यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आला.



उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, उपसचिव अशोक मांडे, संबंधित विभागीय अधिकारी, राज्य राष्ट्रीय सेवा योजना संपर्क अधिकारी डॉ. मिलिंद काळे आदी यावेळी उपस्थित होते. राज्यातील विविध विद्यापीठांचे एनएसएस संचालक, महाविद्यालयांचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवकांसह ६७० हून अधिक प्रतिनिधींनी ऑनलाइन या कार्यक्रमात सहभाग नोंदविला. मंत्री पाटील म्हणाले की, नेत्रदान हे मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणारे सर्वोच्च दान आहे. १० जून या जागतिक नेत्रदान दिनाच्या पार्श्वभूमीवर सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये मरणोत्तर नेत्रदानाबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. नेत्रदान जनजागृती उपक्रमांसोबत नेत्रतपासणी व नेत्रचिकित्सा शिबिरांचे आयोजन करून हा संदेश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचवावा आणि समाजातील नागरिकांना नेत्रदानासाठी प्रेरित करावे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ५ जून २०२४ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' या देशव्यापी अभियानाचा प्रारंभ केला. या मोहिमेंतर्गत प्रत्येक नागरिकाला आपल्या आईच्या सन्मानार्थ आणि आईच्या नावाने एक रोपटे लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या माध्यमातून पर्यावरणाचे रक्षण करणे, हरित आवरण वाढवणे आणि आईप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हा एक उद्देश असून हे अभियान एक मोठी जनचळवळ बनली आहे. त्यामुळे 'एक पेड माँ के नाम' या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहनही मंत्री पाटील यांनी केले.आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्व महाविद्यालयांमध्ये २१ जून रोजी योग मार्गदर्शन, योगाभ्यास शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करावे. योगामुळे शारीरिक, मानसिक आणि भावनिक स्वास्थ्य वृद्धिंगत होत असल्याने विद्यार्थ्यांनी योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवावे, असे

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी प्रत्येक जिल्ह्यात सीईटीसेलचे विद्यार्थी सहाय्यता केंद्र

**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांची घोषणा : विद्यार्थ्यांना अचूक मार्गदर्शन आता जिल्हास्तरावर मिळणार**

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP), शिष्यवृत्ती योजना आणि प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अचूक माहिती व योग्य मार्गदर्शन त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात 'सीईटीसेलचे विद्यार्थी सहाय्यता केंद्र' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज येथे केली. मंत्रालयात मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली



यासंदर्भात बैठक संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तसेच जिल्हास्तरीय समन्वयक ऑनलाइन उपस्थित होते. बैठकीत सर्व जिल्ह्यातील सीईटी विद्यार्थी सहाय्यता केंद्राचा आढावा घेण्यात आला. मंत्री पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर विश्वासार्ह माहिती, अचूक मार्गदर्शन सहजपणे त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, यासाठी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे सुरू करण्यात आली आहेत, तसेच ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील कामांसाठी वारंवार मोठ्या शहरांमध्ये जाण्याची आवश्यकता भासू नये, त्यांना प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती, विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती व आवश्यक मार्गदर्शन त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, या हेतूने ही केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकूण ४० सीईटी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे सुरू करण्यात येत असून मुंबईत तीन, पुण्यात दोन आणि नागपुरात दोन केंद्रे असतील. यापैकी २६ केंद्रांचे काम पूर्ण झाले असून सहा केंद्रे अंतिम टप्प्यात आहेत. उर्वरित आठ केंद्रेही लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या केंद्रांच्या सेवा १० जून पासून सुरु होणार आहेत, असे यावेळी सांगण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ‘या शहरानं दिलेलं रिटर्न गिफ्ट’ कवितासंग्रहाचे प्रकाशन उत्साहात

पुणे (दैनिक संध्या) : कवी नैनेश तांबे यांच्या ‘या शहरानं दिलेलं रिटर्न गिफ्ट’ या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर नैनेश तांबे यांच्या आई-वडिलांच्या हस्ते कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविकात नितीन शिंदे यांनी पुस्तकाच्या प्रवासाविषयी माहिती दिली, तर प्रकाशक अमृता तांदळे यांनी पुस्तकाचे साहित्यिक महत्त्व स्पष्ट केले. प्रमुख पाहुणे अपूर्व राजपूत, डॉ.स्वप्निल चौधरी, सारंग पांपटवार व अभि मुंढे यांनी नैनेश यांच्या कवितेतील सामाजिक भान, संवेदनशीलता आणि माणूसपणावर भाष्य केले. यावेळी नैनेश यांचे वडील संतोष तांबे यांचे मनोगत उपस्थितांना भावूक करून गेले. मनोगतात कवी नैनेश तांबे यांनी उपस्थितांचे आभार मानत आपल्या काव्यप्रवासातील भावना व्यक्त केल्या. अध्यक्षीय समारोपात सुरेशकुमार वैराळकर (अण्णा) यांनी नव्या पिढीच्या साहित्यिक जाणीवांचा गौरव केला.




### चाकणला कर्तुत्वान नागरिकांचा गौरव पुरस्काराने सन्मान

चाकण (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य स्व. किरणशेठ मांजरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ समाजात चांगले काम करणाऱ्या कर्तुत्वान नागरिकांचा गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. समाजात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्काराच्या माध्यमातून प्रोत्साहन मिळावे म्हणून विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तुत्वान नागरिकांचा गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते, धर्माचार्य ॲड. शंकर शेवाळे, समाज प्रबोधनकार हभप. मुक्ताजी महाराज नाणेकर, नगरसेवक नितीन गोरे, उद्योजक बाळासाहेब मांजरे, राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक सचिन मांजरे आदींच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. संवर्धन क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या सपना हिराचंद राठोड यांना पर्यावरण संवर्धन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. वृक्ष लागवड व पर्यावरण संरक्षणात विशेष योगदान देणारे अनंत तायडे यांना पर्यावरण संरक्षक पुरस्कार देण्यात आला. उद्योग क्षेत्रात कौतुकास्पद कामगिरी केल्याबद्दल चाकण येथील उद्योजक राजेंद्र दत्तात्रय गोरे यांना उद्योग महर्षी पुरस्कार, तसेच सलग तीस वर्ष राजगुरुनगर सहकारी बँकेवर निवडून येत असलेल्या विजया रामदास शिंदे यांना सहकार महर्षी पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिष्यवृत्ती व इतर स्पर्धा परीक्षांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची निवड होत असल्याबद्दल आणि त्यासाठी योगदान देणारे राजेंद्र महादेव गारगोटे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# पूर्वसूचना न देता वीज खंडित करू नका

## सासवडच्या नगराध्यक्षांचे 'महावितरणला निवेदन



सासवड (ता. पुरंदर) : वीर पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याप्रकरणी महावितरणचे कार्यकारी अभियंता भालचंद्र गवई यांना निवेदन देताना सासवड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप व नगरसेवक.

**सासवड (दै. संध्या)**

सासवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या 'वीर पाणी पुरवठा योजने'ला महावितरणच्या अघोषित वीज कपातीचा मोठा फटका बसत आहे. कांबळवाडी येथील पंपिंग स्टेशनच्या एक्सप्रेस फीडरचा वीज पुरवठा कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक खंडित केला जात असल्याने सासवड शहराचा पाणी पुरवठा वारंवार विस्कळीत होत आहे. यामुळे सासवडकरांना पाण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागत असून, या गंभीर समस्येची दखल घेत सासवड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी मंगळवारी महावितरण प्रशासनाला तीव्र शब्दांत निवेदन देत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

महावितरणचे कार्यकारी अभियंता भालचंद्र गवई यांना नगराध्यक्षांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने हे निवेदन दिले. कांबळवाडी येथील पाणी पुरवठा योजना ही पूर्णपणे विजेच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. एक्सप्रेस फीडर असूनही वारंवार वीज गायब होत असल्याने पाणी उपसा थांबतो आणि संपूर्ण शहराचे पाण्याचे नियोजन कोलमडते. ऐन उन्हाळ्यात किंवा ऐनवेळी नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने लोकप्रतिनिधींनी महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे तीव्र नाराजी व्यक्त केली.

निवेदनात, कांबळवाडी येथील पाणी योजनेच्या एक्सप्रेस फीडरला २४ तास अखंडित वीज पुरवठा पुरवण्यात यावा. अपरिहार्य कारणास्तव अथवा दुरुस्तीच्या कामासाठी वीज पुरवठा बंद करायचा असल्यास, त्याची पूर्वसूचना किमान २४ तास आधी नगरपरिषदेला लेखी स्वरूपात किंवा दूरध्वनीद्वारे द्यावी, जेणेकरून शहरात पाण्याचे योग्य नियोजन करता येईल. एखादा तांत्रिक बिघाड झाल्यास महावितरणने तातडीने विशेष पथक पाठवून वीज पुरवठा युद्धपातळीवर पूर्ववत करावा अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिशय संवेदनशील असल्याने महावितरणने यावर तातडीने आणि सकारात्मक कारवाई करावी, अशी आग्रही मागणी नगराध्यक्षांनी लावून धरली. यावर महावितरणचे कार्यकारी अभियंता भालचंद्र गवई यांनी समस्येचे गांभीर्य मान्य केले. याबाबत तातडीने परिंचे येथील महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या जातील असे आश्वासन त्यांनी दिले.

याप्रसंगी महावितरणचे उपअभियंता रोहित ढामसे यांच्यासह सासवड नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेविका लिना वढणे, अर्चना जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, नगरसेवक राजन जगताप, प्रदीप राऊत, साकेत जगताप, सुहास जगताप आणि ॲड. सौरभ वढणे उपस्थित होते.

## ‘सनातन संस्कार प्रशिक्षण वर्गा’ला समाजातून उत्स्फूर्त प्रतिसाद

### ४८८ बालकांचा सहभाग, १२ ठिकाणी नियमित संस्कार वर्गांची मागणी !

**पुणे (दै. संध्या)**

भारतीय संस्कृतीत मंदिरे ही केवळ उपासनेची ठिकाणे नसून समाजाला संस्कार देणारी केंद्रे मानली जातात. याच परंपरेचा वारसा पुढे नेण्यासाठी सनातन संस्था आणि मंदिर महासंघ यांच्या वतीने 9 ते 15 वयोगटातील मुलांसाठी उन्हाळी सुट्टीत ‘सनातन संस्कार प्रशिक्षण वर्गांचे’ आयोजन करण्यात आले होते. मंदिरांच्या सात्त्विक वातावरणात घेण्यात आलेले हे वर्ग मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त तर ठरणार आहेत, अशी माहिती सनातन संस्थेचे प्रा.विठ्ठल जाधव यांनी दिली.

सनातन संस्था मागील 26 वर्षांपासून विनामूल्य अध्यात्म प्रसाराचे कार्य करत आहे. आजच्या डिजिटल युगात मुले मोबाईल आणि टीव्हीमध्ये अधिक गुंतत आहेत. अशा वेळी त्यांना चांगले संस्कार, नैतिक मूल्ये आणि भारतीय संस्कृतीची ओळख करून देणे अत्यंत आवश्यक झाले आहे.




या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील भोर,भोसरी, सिंहगड रस्ता, जुन्नर, हडपसर, चिंचवड तानाजी नगर,थेरगाव, विश्रांतवाडी, कोथरूड-वारजे,धनकवडी, बिबवेवाडी, शिवाजी नगर, पिंपरीगाव, कोथरूड, बारामती आणि प्राधिकरण या भागात शिबिरे यशस्वीपणे पार पडली. 26 एप्रिल 2026 पासून सुरू झालेल्या शिबिरामध्ये आतापर्यंत 488 बालक सहभागी झाले. 185 पालक समारोपीय सत्रात सहभागी झाले. 12 ठिकाणी नियमित संस्कार वर्ग सुरू करण्यासाठी पालकांनी आग्रही मागणी केली आहे.

पाच दिवसांच्या या प्रशिक्षण वर्गात दररोज 3 तास मुलांना प्रार्थना, नामजप, आदर्श दिनचर्या, चांगल्या सवयी, नैतिक मूल्ये, भारतीय संस्कृती, कथाकथन, आध्यात्मिक खेळ आणि व्यक्तिमत्त्व विकास यांचे मार्गदर्शन करण्यात आले. विविध ठिकाणी घेण्यात आलेल्या प्रशिक्षण वर्गांच्या यशस्वी आयोजनात स्थानिक नागरिक,मंदिर विश्वस्त यांसह लोकप्रतिनिधींनी उत्तम सहकार्य केले.

**पालकांच्या अनुभूतीतून संस्कार वर्गांचे महत्त्व अधोरेखित !**

काव्या ताडपत्री या बालिकेने सांगितले, “हे शिबिर मला खूप आवडले. ते आणखी काही दिवस असते तर मी नक्की सहभागी झाले असते.” तिच्या आईने प्रतिक्रिया देताना सांगितले, “येथे दिले जाणारे ज्ञान अत्यंत उपयुक्त आहे. असे मार्गदर्शन अन्यत्र मिळत नाही. दरवर्षी अशा शिबिरांचे आयोजन व्हावे.”

## विघ्नहर नर्सिंग होममध्ये सर्पदंश उपचाराचे विशेष प्रशिक्षण

**नारायणगाव (दै. संध्या)**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने विघ्नहर नर्सिंग होम व संशोधनं आणि प्रशीक्षण केंद्र, नारायणगाव येथे समर इंटर्नशिप प्रोग्राम (एसआयपी) आयोजित केला होता. या अंतर्गत सहभागी झालेल्या राज्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयातील तीस प्रशिक्षणार्थी भावी डॉक्टरांना सर्पदंश व उपचार, वैद्यकीय संशोधनं, आरोग्य शिक्षण, विषबाधा, आपत्कालीन व्यवस्थापन आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. जागतिक सर्पदंश व विषबाधा उपचारतज्ज्ञ डॉ. सदानंद राऊत , डॉ. पल्लवी राऊत, डॉ. ऋचा मते, डॉ. मकरंद घोरपडे, डॉ. सुजाता गोरडे, डॉ. अजय मते, डॉ. नितीन सोनवणे,डॉ. प्रतीक मुंगेकर, समन्वयक डॉ.स्नेहा मिश्रा यांनी मार्गदर्शन केले. पंधरा दिवसांच्या या निवासी शिबिरात लातूर,नागपूर, बीड, पुणे, नाशिक, इगतपुरी, संभाजी नगर, अहिल्यानगर , चंद्रपूर, बुलढाणा, जळगाव, संगमनेर, कोल्हापूर, सांगली, नांदेड, धुळे, वर्धा येथील वैद्यकीय महाविद्यालयातील ज्योती पुसनाके, आयुष रामचंदनी, प्राची गाढे, सागर खोट, रोहित थोरवे, दिव्या भामरे, आम्रपाली लोखंडे, अर्चना दराडे, आयुष नलावडे, प्रध्युम शिवने, दुर्गा बंकर, आदित्य माने, कमलेश अलंकार, श्रुती कार्डिले, श्वेता पवार, सार्थक देओतले आदी प्रशिक्षणार्थी डॉक्टर सहभागी झाले होते. प्रशिक्षणाचा समारोप जेष्ठ पत्रकार रवींद्र पाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या वेळी माजी प्राचार्य डॉ. दामोदर गरकल, नंदू आडसरे, प्रा. ज्योतीराम वगरे आदि उपस्थित होते.

## शिक्षण विस्तार अधिकारी निलीमा मेमाणे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा




**जेजुरी (दै. संध्या)**

बारामती पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील विस्ताराधिकारी निलीमा कुंडलिक मेमाणे या आपल्या ३८ वर्षांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेनंतर नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या.

त्यानिमित्त त्यांचा सेवापूर्ती सत्कार पुणे जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानाहून बोलताना कारेकर म्हणाले, शिक्षण क्षेत्रात काम करीत असताना निलिमा मेमाणे व त्यांचे पती कुंडलिक मेमाणे यांनी प्रामाणिकपणे काम केले. त्यामुळे कुंडलिक मेमाणे यांना राष्ट्रपती पारितोषिक मिळाले. यात 50% वाटा हा निलिमा मेमाणे यांचा आहे. पुरंदर तालुक्यात शिक्षणाचा इतिहास विषय लिहावयाचा झाला तर मेमाणे यांच्या नावाशिवाय तो पूर्ण होणार नाही. आई-वडिलांनी दिलेली शिकवण निलिमा मेमाणे यांनी अमलात आणून शिक्षण क्षेत्रात भरीव काम केले असल्याचे कारेकर यांनी सांगितले.

यावेळी डॉ.भाऊसाहेब कारेकर, महेश शेंडकर, नंदकुमार सागर व अशोक टिळेकर यांनी मनोगते व्यक्त केली. सत्काराला उत्तर देताना निलीमा मेमाणे यांनी आपल्या ३८ वर्षांच्या सेवाकाळातील विविध आठवणींना उजाळा दिला. तसेच शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, सहकारी कर्मचारी, मित्रपरिवार व कुटुंबीयांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी माजी नगराध्यक्ष मनोहर जगताप, विजय वढणे वसंतराव ताकवले, सिद्राम भुजबळ, रामदास जगताप, बळवंत गरुड, कैलास मेमाणे, प्रताप मेमाणे, तुकाराम भागडे, जांबुवंतराव घोडके, अरविंद गोलांडे, गोविंद लाखे, राजेंद्र जगताप, उदय कोठावळे, अनिल कदम, विलास मोरे, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, आप्तेष्ट व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय रोकडे यांनी केले. तर कार्यक्रमाचे आयोजन सौ प्राजक्ता मेमाणे यांनी केले आभार नीरज मेमाणे यांनी मानले.

## ‘आरपीआय’ महत्वाच्या भूमिकेत : डॉ. हुलगेश चलवादी

### विधानसभेतील २० ते २५ जागांवर पक्षाची विशेष मोर्चेबांधणी

**पुणे (दै. संध्या)**

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या नुकत्याच झालेल्या वाराणसी दौऱ्यामुळे उत्तर प्रदेशातील राजकीय वातावरण तापले आहे. युपी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने राज्यात जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली असून, मा.आठवले साहेबांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे आमदार उत्तर प्रदेशात निश्चितपणे निवडून येतील. 'यूपी'तील राजकीय रणसंग्रामात 'आरपीआय' महत्वाच्या भूमिकेत असून याचा परिणाम आगामी विधानसभा निवडणुकीत दिसून येईल, असा विश्वास पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष,बहुजन नेते डॉ.हुलगेश चलवादी यांनी व्यक्त केला आहे.

उत्तर प्रदेशात पक्ष बळकट करण्यासाठी 'आरपीआय' पूर्ण ताकदीने मैदानात उतरली आहे. पक्षाने राज्यातील २० ते २५ जागांवर विशेष लक्ष केंद्रित केले असून, २६ नोव्हेंबर रोजी 'संविधान दिना'चे औचित्य साधून लखनऊमध्ये एका ऐतिहासिक महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीच्या माध्यमातून सुमारे १ लाख लोकांना एकत्र आणून पक्षाचे मोठे शक्तिप्रदर्शन करण्याचा निर्धार मा.आठवले साहेबांनी बोलून दाखवला असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

उत्तर प्रदेशच्या राजकारणात दलित, शोषित आणि मागासवर्गीय मतदारांची भूमिका नेहमीच निर्णायक राहिली आहे. दलित मतांचे विभाजन आणि पारंपारिक पक्षांबद्दल असलेला असंतोष यांमुळे एक मोठी राजकीय पोकळी 'यूपी'त निर्माण झाली आहे. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी नेहमीच वंचित घटकांचा आवाज दिल्लीच्या दरबारात बुलंद केला आहे. त्यामुळे युपीमधील आंबेडकरी आणि बहुजन समाज आता आरपीआयला एक सक्षम आणि विश्वासार्ह पर्याय म्हणून बघतो असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

वाराणसी, पूर्वांचल आणि अवध प्रांतातील विशिष्ट जागांवर दलित आणि मागासवर्गीय मतदारांची संख्या लक्षणीय आहे. या जागांवर आरपीआयने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मा.आठवले साहेबांच्या प्रभावी नेतृत्वामुळे पक्ष यावेळी उत्तर प्रदेशच्या विधानसभेत मानाने प्रवेश करीत निळा झेंडा फडकवेल, असा विश्वास डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला.


# शिर्डीतील ‘साई तीर्थ’ बनले पर्यटकांचे नवे आकर्षण

**भक्ती, तंत्रज्ञान आणि मनोरंजनाचा अनोखा संगम**

**श्रेया मालपानी, संचालक, मालपानी ग्रुप**

**शिर्डी (दै. संध्या)**

शिर्डीची सहल आता केवळ साईबाबांच्या दर्शनापुरती मर्यादित राहिलेली नसून, आधुनिक पर्यटनाच्या दृष्टीने नव्या अनुभवांची भर पडत आहे. साईबाबा मंदिरापासून अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरावर असलेले ‘साई तीर्थ भक्ती थीम पार्क’ हे शिर्डीतील प्रमुख पर्यटन आकर्षण म्हणून उदयास आले आहे. भक्ती, संस्कृती, तंत्रज्ञान आणि मनोरंजनाचा अनोखा संगम असलेल्या या थीम पार्कमुळे पर्यटकांना एकाच छताखाली वेगळा अनुभव मिळत आहे.



मालपानी ग्रुपच्या संचालिका श्रेया मालपानी यांनी ‘साई तीर्थ’मधील पाच प्रमुख आकर्षणांची माहिती देताना सांगितले की, भारतातील पहिले पूर्णपणे वातानुकूलित इनडोअर भक्ती थीम पार्क म्हणून ‘साई तीर्थ’ची ओळख आहे. दर्शनानंतर कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक, मुले आणि तरुणांसाठी हे एक आदर्श पर्यटनस्थळ ठरत आहे.

**तीर्थ यात्रा : देशभरातील मंदिरांचा एकाच ठिकाणी अनुभव**

‘तीर्थ यात्रा’ या आकर्षणाद्वारे पर्यटकांना देशातील दहा प्रसिद्ध मंदिरांची आभासी सफर घडवली जाते. आधुनिक व्हिज्युअल इफेक्ट्स, मोशन टेक्नॉलॉजी आणि कथाकथनाच्या माध्यमातून भारतातील विविध तीर्थक्षेत्रांचा अनुभव एकाच ठिकाणी घेता येतो.

**द्वारकामाई : श्रद्धा आणि शांततेचा प्रवास**

साई तीर्थच्या जवळ असलेली द्वारकामाई ही साईबाबांच्या वास्तव्यामुळे विशेष महत्त्वाची मानली जाते. येथे आजही अखंड धुनी प्रज्वलित असून, शांत आणि आध्यात्मिक वातावरणामुळे भाविकांना अंतर्मुख होण्याची संधी मिळते.

**विक्रमी साईबाबा मोझॅक**

युवा कलाकार चिन्मय प्रभू यांनी शेकडो रुबिक्स क्यूब्स वापरून साकारलेले साईबाबांचे भव्य मोझॅक हे ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’मध्ये नोंदले गेले आहे. भक्ती आणि सर्जनशीलतेचा संगम असलेली ही कलाकृती पर्यटकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.

**लेझर शोमधून साकारते साईबाबांची जीवनगाथा**

संध्याकाळच्या वेळी आयोजित करण्यात येणारा लेझर शो प्रकाश, ध्वनी, संगीत आणि अत्याधुनिक प्रोजेक्शन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साईबाबांचे जीवन आणि शिकवणी प्रभावीपणे सादर करतो. हा अनुभव पर्यटकांच्या भेटीला संस्मरणीय बनवतो.

**‘सबका मलिक एक’चा प्रेरणादायी संदेश**

‘सबका मलिक एक’ या सिनेमॅटिक सादरीकरणातून साईबाबांचे विचार, मानवता, करुणा, एकता आणि विश्वास यांचा संदेश प्रभावीपणे मांडला जातो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सादर केलेला हा अनुभव सर्व वयोगटांतील पर्यटकांना भावनिकदृष्ट्या जोडून ठेवतो.

साईबाबा मंदिराजवळील सोयीस्कर स्थान, आधुनिक सुविधा आणि भक्ती-मनोरंजनाचा संगम यामुळे ‘साई तीर्थ’ हे शिर्डीतील अविभाज्य पर्यटनस्थळ बनले आहे. त्यामुळे शिर्डीला भेट देणाऱ्या अनेक पर्यटकांसाठी ‘साई तीर्थ’चा अनुभव हा सहलीचा महत्त्वाचा भाग ठरत आहे.

